www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी
तरुणांचा बुलंद आवाज

दै. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 189 वा मंगळवार दि. 25 मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# बॅंक चालवणाऱ्यांनी बुडवली त्यात ठेवीदारांचा काय दोष ?

## - आ. प्रशांत ठाकूर यांचा विधिमंडळ अधिवेशनात सवाल

**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले**
**संपादक**

पेण अर्बन को-ऑपरेटिव्ह बॅंकेतील खातेदार आणि गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याबाबत विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल झाला होता. अनुषंगाने या विषययावर आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. पेण अर्बन बॅंकेतील ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळण्यासाठी रिझर्व्ह बॅंक आणि निर्बंध संदर्भामध्ये राज्याच्या सहकार खात्याने अधिक सक्रियपणे काम केले पाहिजे अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधानसभेत करत ठेवीदारांना ठेवी परत मिळण्यासाठी या प्रश्नावर पुन्हा एकदा प्रकाश टाकला. एखादी बॅंक चालवणाऱ्यांनी बुडवली त्यात ठेवीदारांचा काय दोष आहे, अशी विचारणा करत कायद्याच्या कचाट्यामध्ये ठेवीदारांनी किती काळ अडकून रहायचे असा सवाल उपस्थित केला. १४ वर्षे निघून गेली त्यामुळे या सगळ्या प्रक्रिया वेगवान करणे आणि ठेवीदारांना न्याय मिळवून देणे शासनाची जबाबदारी आहे. त्या अनुषंगाने जलदगती पद्धतीने कार्यवाही होण्यासाठी रिझर्व्ह बॅंक आणि निर्बंधांमध्ये राज्याच्या सहकार खात्याने अधिक तत्परतेने यामध्ये पुढाकार घेऊन ठेवीदारांना न्याय मिळवून देण्याची आवश्यकता आहे आणि त्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा, अशी आग्रही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधीमंडळाच्या




अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली. तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले होते कि, महाराष्ट्र ठेवीदार हित संरक्षण अधिनियम १९९९ कलम ४ (१) आणि कलम ५ (१) अन्वये सदर मालमत्तांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपविभागीय दंडाधिकारी, पेण यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. सक्षम प्राधिकारी यांनी महाराष्ट्र ठेवीदार हित संरक्षण अधिनियम १९९९ चे अंतर्गत बॅंकेच्या ठेवीतून खरेदी केलेल्या एकूण ४७ मिळकती दि. २४.०७.२०१३ रोजी जप्त केल्या आहेत. तसेच बॅंकेच्या निधीतून खरेदी केलेल्या उर्वरित ८ मालमत्ता व संचालकांच्या ९६ मालमत्ता दि. २१.०६.२०१८ रोजी जप्त केल्या आहेत. सक्षम प्राधिकारी यांनी मा. विशेष सत्र न्यायालय, रायगड अलिबाग यांचे न्यायालयात स्पेशल केस नं. (१/२०११) मध्ये जप्तीचा आदेश स्थायी व अंतिम करण्यासाठी अर्ज व प्रतिज्ञापत्र दाखल केले असून दि. १७.०२.२०१४ रोजी जप्त केलेल्या ३१ मालमत्तांवरील जप्तीचा आदेश कायम करण्यात आला आहे. सक्त वसुली संचालनालय, मुंबई यांचेकडून बॅंकेच्या पैशातून खरेदी केलेल्या मिळकतींवर नोंद करण्यात आलेला बोजा कमी करुन सदर मिळकती सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पेण यांचेकडे कागदोपत्री ताब्यात देण्यात आल्या असून अद्याप कोणतीही रक्कम सक्षम प्राधिकारी अथवा बॅंकेकडे वर्ग करण्यात आलेली नाही. भारतीय रिझर्व्ह बॅंकेने दि पेण अर्बन को-ऑप बॅंकेचा परवाना रद्द केला असला तरी सदर बॅंकेसंदर्भात मा. उच्च न्यायालयात याचिका न्यायप्रविष्ट असल्याने सदर बॅंक अवसायनात घेण्याची प्रक्रीया अद्याप होऊ शकलेली नाही. तसेच भारतीय रिझर्व्ह बॅंकेने पेण अर्बन बॅंकेवर लागू केलेल्या आर्थिक निर्बंधामुळे ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत करता येत नाहीत. सदर प्रकरणाबाबत सुमारे १.४४ लाख ठेवीदारांचा विचार करता विशेष बाब म्हणून ठेवीदारांच्या विमा संरक्षित रक्कमा तातडीने अदा करणेबाबत भारतीय रिझर्व्ह बॅंक तसेच डी.आय.सी.जी.सी. ला आवश्यक ते निर्देश देणेबाबत मा. केंद्रीय राज्य मंत्री (वित्त) यांना मा. मंत्री (सहकार), यांचे स्तरावरुन दि. ३०.१२.२०२२ रोजीच्या पत्राने विनंती करण्यात आली आहे. तसेच बॅंकेने आजपर्यंत विविध माध्यमांतून भारतीय रिझर्व्ह बॅंक, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या मान्यतेने ३८,५९४ ठेवीदारांना रु. ५८.९१ कोटी रकमेचे वाटप केले आहे, असे लेखी उत्तर मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिले.

# उष्णतेचे प्रमाण वाढू लागल्याने आरोग्य सांभाळण्याचे महापालिकेचे आवाहन

### तीव्र उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी काळजी घ्यावी : आयुक्त श्री.मंगेश चितळे

**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले**
**संपादक**

उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस अधिक वाढू लागली आहे.त्यामुळे नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी असे आवाहन महापालिकेच्यावतीने आयुक्त श्री.मंगेश चितळे यांनी केले आहे. गेल्या काही दिवसापासून उन्हाची तीव्रता वाढू लागली असल्याने नागरिकांनी खबरदारी घेणे गरजेचे आहे. येथून पुढील काळात उन्हाळ्याची तीव्रता अधिक वाढणार आहे, त्यामुळे महत्वाच्या कामाशिवाय भर दुपारी उन्हात जाणे नागरिकांनी शक्यतो टाळावे असे आवाहन मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.आनंद गोसावी यांनी केले आहे.




**हे करावे**

1.जेव्हा शक्य असेल तेव्हा पुरेसे पाणी प्या, तहान लागली नसली तरीही थोड्या थोड्यावेळाने पाणी पीत रहावे. तहान हे निर्जलीकरणाचे चांगले सूचक नाही.प्रवास करताना पिण्याचे पाणी सोबत ठेवावे.

2. ओरल रीहायड्रेशन सोल्यूशन (ORS) वापरा आणि लिंबू पाणी, ताक/लस्सी आणि फळांचे रस यांसारखे घरगुती पेये प्यावे.

3. टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्षे, अननस, काकडी, कोशिंबिर तसेच स्थानिक उपलब्ध फळे आणि भाज्या यासारखी उच्च पाणी सामग्री असलेली हंगामी फळे आणि भाज्या खाव्यात.

4. पातळ, सैल, सुती आणि शक्यतो हलक्या रंगाचे कपडे घालावे. तुमचे डोके झाकून ठेवा. थेट सूर्यप्रकाशाच्या संपर्कात असताना छत्री, टोपी, टॉवेल आणि इतर पारंपारिक साधनांचा वापरावे.

5.उन्हात बाहेर जाताना शूज किंवा चप्पल घालाव्यात. हवेशीर आणि थंड ठिकाणी जास्त वेळ घालवा.

6. थेट सूर्यप्रकाश आणि उष्णतेच्या लाटा रोखा. दिवसा खिडक्या आणि पडदे बंद ठेवावे, विशेषतः तुमच्या घराच्या सूर्यप्रकाशाच्या बाजूला. थंड हवा येण्यासाठी त्यांना रात्री खिडक्या उघड्या कराव्यात.

7.जर तुम्ही घराबाहेर जात असाल, तर तुमची घराबाहेरील कामे दिवसाच्या सकाळ आणि संध्याकाळ वेळेपर्यंत मर्यादित करावी. दिवसाच्या थंड वेळांमध्ये बाहेरील कामांचे नियोजन करावे.

8. उष्णतेचा ताण आणि उष्णतेशी संबंधित आजाराचा त्रास असलेल्या संवेदनशील किंवा जास्त जोखीम **पान २ वर**

# डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान कडून पनवेल उपजिल्हा रुग्णालयास साहित्य प्रदान

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/वार्ताहर**

डॉक्टर श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे डॉक्टर श्री नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयास पनवेल येथे अनेक वैद्यकीय उपकरणाचे वाटप करण्यात आले.

आज आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे सदर कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास शेकडो श्री सदस्यां सहित डॉक्टर श्री शिवाजी पाटील वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय पनवेल, डॉक्टर अशोक गीते वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर निशिगंध आठवले रायगड अध्यक्ष रायगड मेडिकल असोसिएशन, डॉक्टर वैभव मोकल सेक्रेटरी पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशन, डॉक्टर अभय शेटे इंडियन मेडिकल असोसिएशन पनवेल हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते

श्री परिवाराच्या परंपरे प्रमाणे अगदी वेळेवर कार्यक्रम सुरू झाला.अतिशय शिस्तबद्धपणे संपन्न झाला. यावेळी प्रतिष्ठान तर्फे दिलेल्या



उपकरणांची चित्रफित दाखवण्यात आली. तदनंतर काही उपकरणे व्यासपिठावर आणून उदघाट्नाची औपचारिकता पुर्ण करण्यात आली. यावेळी उपस्थित हजारो श्री सदस्यांनी टाळ्यांचा गजर केल. मुख्य उपकरणासहित इतर गरजेच्या वस्तू देण्यात आल्या. पनवेल उपजिल्हा रुग्णालयाला डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांचे नाव देण्यात आले आहे. आज त्यांच्या नावे असलेल्या प्रतिष्टान कडून याच ट्रामा केअर हॉस्पिटलला मोठी भरघोस मदत देण्यात आल्याने कार्यक्रमाचे मोठे अप्रूप सर्वांनाच वाटत होते.

# नागोठणे एस. टी. स्थानक आवारातील प्रसाधनगृहाचे तीन तेरा ; प्रवाशांची कुचंबना

### उघड्यावर करावी लागते लघवी ; परिसरात दुर्गंधी

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

एस.टी. स्थानकाच्या आवारातील प्रसाधन गृहाचे तीन तेरा वाजले असून पुरुष प्रसाधनगृहातील शौचालयची टाकी चोकअप झाली आहे. त्यामुळे प्रवाशांची कुचंबना होत असून त्यामुळे प्रवाशांना उघड्यावर लघवी करण्याची नामुष्की येत आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून रोगराई फैलावण्याची भीती व्यक्त होत आहे. नागोठणे हे शहर औद्योगिक क्षेत्र तसेच येथील एस.टी.स्थानक म्हणजे नागोठणे विभाग व राज्य परिवहन मंडळाचे मध्यवर्ती ठिकाण. विभागातून शहरात रोज हजारो लोक खरेदी विक्री व इतर कामांकरीता येत जा करीत असतात. त्यांना प्रवासाचे मुख्य वाहन म्हणजे एस.टी. बसेस तसेच या परिसरात अनेक कंपन्या असून येथील कामगार व शहरातून कामानिमित्त मुंबई, श्रीवर्धन,महाड - पोलादपूरसह कोकणात गावी जाण्यासाठी प्रवास करणाऱ्या प्रवाशांची बस स्थानकात कायम थोड्या फार फरकाने



गर्दी असते. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्या कारणाने प्रत्येकाला लघवी लागणे साहजिकच आहे. परंतु स्थानक आवारात असलेले पुरुष प्रसाधनगृह हे अनेक वर्षे जुने असल्याने मोडकळीस आले आहे.तरीही येथे येणारे प्रवाशी तसेच स्थानक परिसरात असलेले लहान मोठे दुकानदार व नागरीक त्याचा वापर करतात. परंतु गेली महिना दीड महिना शौचालयाची टाकी चोकअप असल्या कारणाने ते बंद आहे असल्याने प्रवाशांची कुचंबना होत आहे. परिसरात दुर्गंधी ; रोगराई फैलावण्याची भीती - प्रसाधनगृह बंद असल्याने जोराची लघवी लागल्यास ती कुठे करावी? हा प्रश्न प्रवाशांना पडत असून नाईलाजास्तव त्यांना उघड्यावर लघवी करावी लागते. उधड्यावर लघवी केल्याने त्या परिसरात दुर्गंधी पसरली आहे. या दुर्गंधीतून रोगराई फैलावली तर त्यास जबाबदार कोण ?? असा सवाल प्रवाशी वर्गाकडून विचारण्यात येत असून प्रसाधनगृह लवकरात लवकर चालू करण्याची मागणी होत आहे.

सदरील पुरुष प्रसाधनगृहातील शौचालय टाकी चोक अप असल्याने गेल्या एक महिन्या पासून बंद आहे. त्याच्या दुरुस्तीसाठी रामवाडी येथील विभागीय कार्यालयात प्रस्ताव पाठविला आहे. तो प्रस्ताव पुढील एक दोन दिवसात मंजूर होऊन येईल त्यानंतर लगेच काम करून प्रसाधनगृह चालू करण्यात येईल .

**प्रकाश शेलार, आगार व्यवस्थापक**
**रा.प.रोहा आगार**

# आष्टी तालुक्यात येणार पाणलोट रथयात्रा, प्रशासन यंत्रणा सुसज्ज...

**दैनिक युवक आधार**
**आष्टी। प्रतिनिधी**

प्रत्येक गावात सामूहिक श्रमदानातून पाणलोट चळवळ निर्माण व्हावी या उद्देशातून केंद्र सरकारने राज्यातील ३० जिल्ह्यात पाणलोट यात्रा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात पाणलोट रथयात्रा शुक्रवार दि २८ मार्च रोजी आष्टी तालुक्यात आगमन होणार असून वाघळुज व लमाण तांडा येथे रथयात्रा येणार असल्याची माहिती पाणलोट समिती वाघळूजच्या अध्यक्षा सुनंदा सुभाष गुंड यांनी दिली. या यात्रेचे उद्घाटन आ. सुरेश धस यांच्या हस्ते होणार असून

**पाणलोट कामांवर श्रमदान अपेक्षित**

सर्व यंत्रणांना एकत्र येऊन गावोगावी पाणलोट चळवळ निर्माण व्हावी, या अनुषंगाने मृद व जलसंधारण कामांचे भूमिपूजन करणे, पाणलोट कामांवर श्रमदान करणे, पाणलोट योद्धे निवडणे इत्यादी कामांचे सूक्ष्म नियोजन करून या उपक्रमांतर्गत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, बचत गटातील महिला, स्वयंसेवी संस्था व शेतकरी यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन बीड जिल्हा जलसंधारण अधिकारी संजय आमले यांनी केले आहे.




प्रमुख उपस्थिती म्हणून बीड जिल्हा जलसंधारण अधिकारी संजय आमले,तहसीलदार वैशाली पाटील, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे,माजी आ. साहेबराव दरेकर, सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ता काकडे आदी उपस्थित राहणार आहेत.या यात्रेच्या नियोजनासाठी व स्वागतासाठी प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा तथा उपविभागीय जलसंधारण अधिकारी सतिश पाटील आणि त्यांचे सहकारी परिश्रम घेत आहेत.



द•ख•ल

## "जोगेश्वरी श्री २०२५ – वैभव कदम व शैलेश कुंदर यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य आयोजन!"

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी,प्रमुख**
**किशोर रमाकांत गुडेकर**




मुंबई, २२ मार्च २०२५: जोगेश्वरी येथे शनिवार, २२ मार्च रोजी संध्याकाळी ६.०० वाजता भव्य सांस्कृतिक संध्येचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. संसद सदस्य श्री. रवींद्र दत्ताराम वायकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि गेस्ट ऑफ ऑनर सौ. मनिषा आर. वायकर यांच्या सन्माननीय उपस्थितीत हा सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन श्री. शैलेश कुंदर आणि श्री. वैभव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रसिद्ध अभिनेते श्री. मुकेश ऋषी आणि श्री. हरीश पटेल, वीरा सक्सेना यांनी हजेरी लावून सोहळ्याची शोभा वाढवली.

यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा विशेष सत्कार करण्यात आला. "जोगेश्वरी श्री" किताबाचे मानकरी आयकर विभागातील श्री. सागर कतुर्डे यांना ट्रॉफी प्रदान करून गौरविण्यात आले. कार्यक्रमास आमंत्रित म्हणून श्री. ज्ञानेश्वर सावंत (विभाग प्रमुख), सौ. प्रियांका पी. आंबोळकर (महिला विचार प्रमुख) आणि श्री. प्रवीण जी. शिंदे यांनी उपस्थिती लावली. सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्य, संगीत आणि नाट्यप्रयोगांची रंगतदार सादरीकरणे करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी सामाजिक आणि सांस्कृतिक कार्याचा गौरव करत अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल नागरिकांनी आणि मान्यवरांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले. संस्कृती, समाज आणि मनोरंजन यांचा सुंदर संगम असलेल्या या सोहळ्याने उपस्थितांना संस्मरणीय अनुभव दिला.

## आठव्या दिवशी उपोषण सुरू

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**




पनवेल शहरातील पंचायत समितीच्या आवारात सुरू असलेले उपोषण आठव्या दिवशी देखील सुरूच आहे. माती उत्खनन करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यासाठी हे उपोषण सुरू करण्यात आले आहे. 17 मार्चपासून पनवेल पंचायत समिती येथे ग्रामस्थांचे आमरण उपोषण सुरू आहे. माती उत्खनन केल्याप्रकरणी आणि जमीन खरेदी करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र प्रशासन अद्यापही याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप दत्तात्रय तांडेल यांनी केला आहे. 24 मार्च रोजी पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांनी या ठिकाणी भेट दिली. बेकायदा माती उत्खनन करणाऱ्यांवर लवकरात लवकर गुन्हा दाखल करावा अशी मागणी यावेळी उपोषण कर्त्यांकडून करण्यात आली.

## कलश एंटरटेनमेंटतर्फे अस्तित्व नारी सन्मान पुरस्काराने रा.जि.प.नवीन शेवे शाळेतील शिक्षिका चैताली म्हात्रे सन्मानित.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**




"दर्जेदार आणि गुणवत्ता पूर्ण शिक्षण हेच ध्येय" असे ब्रीदवाक्य असणाऱ्या रा.जि.प.शाळा नवीन शेवे येथील उपक्रमशील शिक्षिका चैताली राकेश म्हात्रे यांना कलश एंटरटेनमेंटतर्फे अस्तित्व नारी सन्मान पुरस्कार "बेस्ट टीचर" या पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. ८ मार्च महिला दिनाचे औचित साधून कलश एंटरटेनमेंटतर्फे अस्तित्व नारी सन्मान पुरस्कार कलश एंटरटेनमेंटच्या संस्थापिका श्लोक पाटील आणि सहसंस्थापिका कल्पना सुर्वे यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या या पुरस्कारासाठी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना सन्मानित केले जाते. त्यांनी केलेल्या कामाचा कामाचा गौरव व त्यातून इतर महिलांना प्रेरणा मिळण्यासाठी या पुरस्काराचे आयोजन केले जाते. शनिवार दिनांक २२ मार्च रोजी उरण मधील सिल्वर ओक या रिसॉर्टमध्ये या भव्य दिव्य अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून सिने अभिनेत्री प्रिया बेर्डे , शैलजा घरत या मान्यवरांच्या उपस्थितीत २३ महिलांना सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यात चैताली म्हात्रे यांना त्यांचे शैक्षणिक कार्य व समाज कल्याण, या क्षेत्रातील उत्तुंग कामगिरी बद्दल सिने अभिनेत्री प्रिया बेर्डे यांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व सुंदर रोपटे देऊन "बेस्ट टिचर" म्हणून सन्मानित करण्यात आले. उपक्रमशील शिक्षिका चैताली राकेश म्हात्रे या रा.जि.प. शाळा नवीन शेवे येथे कार्यरत असून, त्यांचे स्वतःचे यूट्यूब चॅनेल आहे .आणि त्या आपल्या विद्यार्थ्यांसाठी नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजित करीत असतात. त्यांनी नवोपक्रम आतापर्यंत बरेच राबवले आहेत. तसेच त्यांचा पालकवर्गाबरोबर उत्तम संवाद आणि संपर्क आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी , तसेच आताच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थी टिकले पाहिजे व शिकले ही पाहिजेत या उदात्त हेतूने दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे, प्रत्यक्ष अनुभव मिळावे, शिक्षण हे फक्त शिक्षणच नाही तर ते आनंददायी शिक्षण व्हावे यासाठी त्या नेहमीच प्रयत्नशील असतात. याकरता त्यांनी तयार केलेले त्यांचे व्हिडिओ त्यांच्या यूट्यूब चॅनेल ला टाकून त्यानंतर ते त्यांच्या शालेय व्यवस्थापन समिती त्याचबरोबर माता पालक संघ ,पालक वर्ग आणि उरण तालुक्यातील शिक्षक वर्ग यांच्या ग्रुप वर ही पाठवून या उपक्रमांची प्रसिद्धी केली जाते इतरांना ही या उपक्रमातून प्रेरणा मिळावी म्हणून त्या सोशल मिडीयावरून प्रत्येकाच्या घरी पोहोचल्या आहेत. त्यामुळे सर्वांकडून त्यांच्या उपक्रमांचे कौतुक होते. चैताली म्हात्रे या नेहमीच आपल्या बुद्धीचा उपयोग काही ना काही सामाजिक उपक्रम साध्य होण्यासाठी त्या झटत असतात. त्यामुळे त्यांच्या कार्याची पोचपावती म्हणून २०२४ मध्ये त्यांना " द्रोणागिरी भूषण" हा मानाचा पुरस्कार मिळाला आहे.तसेच "सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार,"अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघातर्फे विशेष पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. कलश एंटरटेनमेंटतर्फे अस्तित्व नारी सन्मान पुरस्कार सोहळ्यासाठी त्यांचे कटुंबही उपस्थित होते. त्यांनी मिळवलेल्या या "बेस्ट टिचर" पुरस्कार बद्दल त्यांच्या वर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मोबाईल चोरट्यास 2 तासात केले जल बंद.

**(स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही)**
**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभाग**
**प्रमुखः-राजू शिंदे**

जालना जिल्हयातील चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल साहेब यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना देवुन मार्गदर्शन केले होते. दिनांक 23/03/2025 रोजी पोलीस ठाणे कदीम जालना हद्दीत सोमेश्वर महादेव मंदीर येथुन टॅब, मोबाईल ATM कार्ड असलेली बॅग चोरीस गेल्याची फिर्याद हि फिर्यादी नामे आरती रावसाहेब शिंदे रा. अष्टविनायक सिटी गांधी चमन जुना जालना यांनी दिली होती. यावरुन पोस्टे कदीम जालना येथे अज्ञात आरोपी विरुद्ध गुरनं. 105/2025 कलम 303(2) भा.न्या. सं. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना चोरीचा गुन्हा उघडकीस आणणेबाबत सुचना देवुन मार्गदर्शन केले होते. त्या अनुषंगाने वरील स्टाफ यांना सदर चोरी गेलेली बॅग हि शनीमंदीर जालना येथील आरोपी नामे दिपक दत्ता नाईकवडे रा. शनिमंदीर जालना यांनी चोरी केलेली आहे अशी खात्रीलायक माहिती मिळाली होती. त्यावरुन वरील स्टाफ यांनी सदर इसमाचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेवुन त्याला गुन्हया संबंधी विचारपुस करतां त्यांनी वरील गुन्हा केल्याची कबुली दिली. व त्यांच्याकडुन 25000/- रु किंमतीचा टॅब व मोबाईल व ईतर साहीत्य असा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने पोलीस ठाणे कदीम जालना येथे गु.र.क्र. 105/2025 कलम 303(2) भ्या.न्या.सं.अन्वये गुन्हा दाखल असुन सदर गुन्हा उघडकीस आणला आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपोणी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी उपविभाग जालना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे मा. पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, पोउपनि राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रामप्रसाद पव्हरे, रमेश राठोड, गोपाल गोशिक, प्रभाकर वाघ, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, रमेश काळे, संदीप चिंचोले यांनी केली आहे

## सर्व जिल्हा परिषद शाळांना सौर विद्युत देणार..

### सीईओंचा प्रहारच्या मागणी वर मोठा निर्णय- जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी

**दैनिक युवक आधार**
**बीड प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शाळांची विद्युत देयके भरण्यासाठी शासनाने स्वतंत्र निधी उपलब्ध करून न दिल्याने बीड जिल्ह्यातील जवळपास सर्वच शाळांची विद्युत देयके थकित आहेत. परिणामी शाळांची विद्युत जोडणी खंडित केली जाऊ शकते. यामुळे जिल्हा परिषद बीड चे कर्तव्यदक्ष आदरणीय सीईओ आदित्यजी जीवने साहेब यांची प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीड चे अध्यक्ष धनंजय कुलकर्णी व सरचिटणीस अविनाश काळे यांनी भेट घेऊन याबाबत निवेदन देऊन, सदरील बिले 15 व्या वित्त आयोगातुन भरण्यासाठी आदेश देण्याची विनंती केली आहे. सदरील भेटीत विद्युत जोडणी अभावी सीईओ साहेबांनी आखलेल्या "मिशन जरेवाडी गुणवत्ता विकास अभियान " वर "ई लर्निंग " अभावी योग्य परिणाम निष्पन्न होण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. ही बाब लक्षात घेऊन आदरणीय सीईओ साहेबांनी जिल्हा परिषद बीड मधील शाळांची कायमस्वरूपी विद्युतची सोय व्हावी यासाठी सर्व जिल्हा परिषद शाळांना लवकरच साधारण दहा कोटी रूपये पर्यंत खर्च करून सौर विद्युत सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासित केले आहे. या चर्चेत सीईओ साहेबांनी यंत्रणेला याबाबत तातडीने आदेश देखील दिले आहेत. यामुळे जि प शाळांची गुणवत्ता वाढीसाठी मोठी मदत होणार असल्याने शिक्षक बांधवांत आनंदाचे वातावरण असून समस्त शिक्षक बांधवांच्या वतीने प्रहार आदरणीय सीईओ साहेबांचे मनःपूर्वक ऋण व्यक्त करत आहे. याप्रसंगी प्रहार शिष्टमंडळात सर्वश्री उर्दू विभाग प्रमुख मिर्झा हसनात, पेन्शनर सेल प्रमुख सुरेश प्रधान व राजेसाहेब चव्हाण, आरोग्य विभाग प्रमुख गोविंद गोचडे,बीड तालुका, अध्यक्ष सय्यद जिलानी, गेवराई तालुका अध्यक्ष बाळासाहेब गावडे,संपर्कप्रमुख शहादेव मराठे, कोषाध्यक्ष उत्तरेश्वर बजगुडे, बाळासाहेब वाघुले, अंबादास बागलाने,केज तालुका अध्यक्ष प्रभूकांत सोन्ने, जिल्हा संघटक सुरेश वाघमारे, सहसचिव महेश भट, कार्याध्यक्ष श्रीकृष्ण जोशी, प्रवक्त्या निर्मला वाघमारे, प्रविणा कांबळे,अशोक सप्रे,पी आर खेडकर, सुमंत यादव, गणेश खेडकर, इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.



## आनंदी उन्हाळा

तिखट मीठ
कैरीची फोड
करवंद जांभळं
आंबट गोड

रसदार तुरट
जामची फळे
गोड मऊसूत
ताडाचे गोळे

मधुर रसाळ
फणस गरे
जरा थोडेच
खाल्लेले बरे

लाल भडक
कापले कलिंगड
घरावर टांगली
बोन्डाची लड

अंगण परसात
कोकमं पिकली
काजू फळांनी
झाडं वाकली

उन्हाळा सारा
सजून गेला
खूप आनंदाने
भिजून गेला

**श्रीनिवास गडकरी**
**रोहा पेण पुणे**

**केवळ नावासहितच पुढे पाठवावे**

## महाड एसटी आगाराच्या बसेस नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढले....

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :-सचिन पवार**
**माणगांव रायगड**

**माणगांव :-** एसटी महामंडळाची सेवा जुन्या बसमुळे ठरतेय त्रासदायक. प्रवासात बस बंद पडण्याचे प्रकार वाढले; प्रवाशांचे हाल.बस सेवा प्रवाशांच्या सेवेसाठी की मनस्तापासाठी?रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ ची पोलादपूर बोरिवली एसटी बस पोलादपूर येथून सकाळी सुटली महाड माणगाव येथे प्रवासी घेत इंदापूर येथील स्थानकात चहा नाश्ता करायला थांबली.चहा नाश्ता करून झाल्यावर बस सुटण्याच्या वेळी बसचा फुगा फुटला आहे असे सांगून सर्व साठ प्रवासी दुसऱ्या गाड्यांमध्ये बसविण्याचा प्रयत्न चालक व वाहक यांनी केला."प्रवाशांच्या सेवेसाठी" हे ब्रीद वाक्य असले, तरी सध्याच्या अनेक एसटी बसप्रवाशांना सेवा देण्यास महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ कमी पडत असल्याचे रोजचे चित्र आहे. प्रवाशांचा वेळ खर्ची होत असल्याचे दिसून येत आहे. याकडे महामंडळ लक्ष देणार आहे का? असा सवाल संतप्त प्रवाशांमधून व्यक्त केला जात आहे. जाणकारांच्या मतानुसार १० लाख किलोमीटर किंवा १० वर्षे असे निकष असताना अनेक एसटी बस १५ लाख किलोमीटरपेक्षा जास्त धावल्या आहेत. तसेच, १५ वर्षांहून अधिक जुन्या अगदी खिळखिळ्या झालेल्या बस अजूनही रस्त्यावर धावत आहेत. त्यामुळे मुंबई गोवा महामार्गावर या बस बंद पडण्याचे प्रमाण वाढत आहे.स्टेअरिंगमध्ये बिघाड होणे, गिअर अडकणे, रेडिएटर फुटणे, इंजिन ओव्हर हीट होणे, टायर फुटणे, स्टार्टरमध्ये बिघाड झाल्याने बसला धक्का मारण्याची वेळ येणे, फॅन बेल्ट तुटणे आदी प्रकार नेहमीचेच झाले आहेत. तर, अंतर्गत भागातही बसचे सीट तुटलेले, गाद्या फाटलेल्या असणे, खिडक्या फुटणे किंवा नसणे, पत्रा तुटलेला असणे तसेच बसचा आवाजही प्रवाशाच्या कानाला सहन होणार नाही इतका असणे, अशा समस्या जुन्या बसमध्ये असतात.अनेकदा लांब पल्ल्यासाठी याच जुन्या बस वापरल्या जात आहेत. त्याचा प्रवाशांना नाहक त्रास सोसावा लागत आहे. वाहक व चालक यांनी अर्धा पाऊण तास गाड्या थांबविण्यासाठी प्रयत्न केले. सोमवार असल्याने सर्वच एसटी बस प्रवाशांनी तुडुंब भरून येत होत्या म्हणून एक दोन प्रवासी मार्गस्थ होऊ लागले.चालक व वाहक यांनी दुसरी बस मागविण्या ऐवजी प्रवाशांना दमदाटी करून इंदापूर येथील बस स्थानकाच्या वाहतूक नियंत्रक महिलेला सांगून बस मागवायला सांगा असे सांगून प्रवाशांना तिकडे पाठविले. महिला वाहतूक नियंत्रक भडकल्या आणि त्यांनी प्रवाशांना चालक व वाहक यांना बोलावून घेण्यास सांगितले.वाहक व वाहतूक नियंत्रक महिलेची खडाजंगी झाली. प्रवाशांची गैरसोय संतापजनक झाली असल्याने प्रवासी खासगी, मिळेल त्या वाहनाने आप आपल्या



कामाच्या ठिकाणी जाऊ लागले.काहींना चालक व वाहक यांनी एसटी बसमध्ये बसवून दिले.एका महिलेला तिच्या चार वर्षे वयाच्या मुलीचेही तिकिट घ्यायला वाहकाने भाग पाडले होते.त्या महिलेला मुलीसह दुसऱ्या एसटी बसमध्ये उभे राहून प्रवास करावा लागणार असल्याने तीदेखील संतापली होती.महाड एसटी डेपोच्या लांब पल्ल्याच्या गाड्या नादुरुस्त होण्याचे प्रमाण जास्त असून प्रवाशांना होणाऱ्या मनस्तापाचे महामंडळाच्या कर्मचारी वर्गाला काहीच सोयरसुतक नसते हे प्रत्येक वेळी दिसून आले आहे.

## तीव्र उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी काळजी घ्यावी : आयुक्त श्री.मंगेश चितळे

**पान १ वरून** असलेल्या लोकांनी अधिक काळजी घ्यावी.

9. घर थंड ठेवा; पडदे, शटर किंवा सनशेड वापरा आणि रात्री खिडक्या उघडा.
10. शरीर थंड करण्यासाठी पंखा, स्प्रे बाटल्या, ओलसर कापड आणि बर्फाचे टॉवेल वापरावा.
11. पाण्यात पाय बुडवल्याने निर्जलीकरण आणि शरीराची उष्णतेमुळे होणारी अस्वस्थता कमी होऊन जलद थंडावा मिळतो.

**'हे' करू नका**

1. उन्हात बाहेर पडणे टाळा, विशेषतः दुपारी १२:०० ते ०३:०० दुपारच्या वेळी बाहेर असताना कठोर परिश्रम टाळा.
2. अनवाणी बाहेर जाऊ नका.
3. अति उष्णवेळेत स्वयंपाक करणे टाळा. स्वयंपाक क्षेत्र पुरेशा प्रमाणात हवा येणासाठी दरवाजे आणि खिडक्या उघड्या ठेवाव्यात.
4. अल्कोहोल, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड सॉफ्ट ड्रिंक्स किंवा मोठ्या प्रमाणात साखर असलेले पेय टाळा- कारण यामुळे शरीरातील जास्त पाणी कमी होते किंवा पोटात पेटके येऊ शकतात.
5. उच्च प्रथिनेयुक्त अन्न टाळा आणि शिळे अन्न खाऊ नका.
6. उभ्या केलेल्या वाहनांमध्ये लहान मुले किंवा पाळीव प्राणी सोडू नका. वाहनातील तापमान धोकादायक ठरू शकते.

## उज्वल हॉस्पिटलचे नवीन जागेत स्थलांतर व नवीन इमारतीचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी**
**बाळासाहेब रकटाटे**

अहिल्यानगर जिल्ह्यातील चिचोंडी पाटील येथील अल्पावधीत नावारुपाला आलेले उज्वल हॉस्पिटलचे नवीन जागेत अत्याधुनिक सेवेसह स्थलांतर होत आहे या हॉस्पिटलचे उद्घाटन श्रीमती उज्वला ज्ञानदेव मापारी यांच्या शुभहस्ते रविवार दि. 30 /3/2025 रोजी संपन्न होत आहे. याच हॉस्पिटलमध्ये डॉक्टर प्रियंका स्किन क्लिनिक नव्याने सुरुवात होत असून या ठिकाणी विविध सेवा रुग्णांना मिळणार आहेत. अशी माहिती डॉक्टर शुभम मापारी यांनी दिली आहे. या हॉस्पिटलमध्ये काही नव्याने सुविधा उपलब्ध होत आहेत.

डॉक्टर प्रियंका शुभम मापारी (खाकाळ) स्त्री रोग व त्वचारोग तज्ञ व डॉक्टर शुभम सुनील




मापारी फॅमिली फिजिशियन व बालरोग तज्ञ यांनी हॉस्पिटलमध्ये खालील अत्याधुनिक सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत. याचा लाभ परिसरातील रुग्णांना चिचोंडी पाटील येथे मिळणार आहे. एक्स-रे इ.सी.जी फिझियोथेरपी सांधेवात, मणका गुडघेदुखी यावर आधुनिक उपचार रक्त, **लघवी तपासण ॲडमिटची सुविधा २४ तास अत्यावश्यक सेवा या ठिकाणी मिळणार आहे त्वचारोग व केसांच्या सुविधाः-**

चेहऱ्यावरचे मुरुम, काळे डाग, पिंपल्स, खड्डे, वांग,काळपटपणा डोळ्याभोवती काळी वतुळें मेडिकेटेड फेशियल्स जुनाट त्वचारोग गोंदण काढणे तीळ,मस काढणे त्वचा हेयर रिमूव्हल ट्रिटमेंट केस गळती, चाई लागणे, पांढरे केस, केसातील कोंडा इ. आधुनिक पद्धतीने उपचार या ठिकाणी केले जाणार आहेत

हे उद्घाटन श्रीमती उज्वला ज्ञानदेव मापारी यांच्या शुभहस्ते होत असून या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती मा.खासदार निलेश श्रीलंके साहेब खासदार अहमदनगर दक्षिण
मा.आ. शिवाजीराव कर्डिले साहेब नगर, राहुरी मतदार संघ मा. प्रा. शशिकांत गाडे सर जिल्हाप्रमुख, शिवसेना अ. नगर श्री. शरदभाऊ पवार सरपंच, चिचोंडी पाटील
श्री. सागरशेठ आमले सरपंच, अंभोरा श्री. संजय विधाते सरपंच, नांदूर श्री. संगीता कांबळे सरपंच दशमीगव्हाण जिल्हाध्यक्ष मा.आ.संग्रामभैय्या जगताप अ.नगर शहर मतदार संघ मा.आ.विक्रमसिंह पाचपुते साहेब श्रीगोंदा मतार संघ इंजि. प्रविणदादा कोकाटे सर सभापती, पंचायत समिती, अ.नगर श्री. शंकर पवार मा. सरपंच, चिचोंडी पाटील श्री. सुनिल लगड सर सरपंच, आठवड श्री. प्रविण खांदवे सरपंच सांडवे श्री. अजय गुंड सरपंच, वाघळुज श्री राजेश परकाळे जिल्हाध्यक्ष संभाजी ब्रिगेड सर्व आजी माजी पदाधिकारी ग्रामस्थ व डॉक्टर असोसिएशन चीचोंडी पाटिल उपस्थित राहणार आहेत अशी माहिती डॉ. शुभम सुनील मापारी (B.H.M.S, C.C.H) फॅमिली फिजिशियन, बाल रोग तज्ज्ञ डॉ. प्रियंका शुभम मापारी (खाकाळ) (B.H.M.S, PGDCC, PGDMT & LASER EXPERT स्त्री रोग तज्ज्ञ,त्वचारोग तज्ञ ) यांनी दिली आहे नवीन स्थलांतरित होणाऱ्या हॉस्पिटल चा पत्ता एस.टी. स्टँड माघे, नगर-जामखेड रोड, चिचोंडी पाटील असा आहे. तरी सर्वांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे

## केदार भगत यांनी घडविले महिलांना कार्ला दर्शन

### महिलांचे केदार भगत यांना आशिर्वाद मिळण्यासाठी साकडे

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/वार्ताहर**

भाजपचे पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत आणि केदार भगत मित्र परिवार यांनी पनवेल शहरातील प्रभाग 19 मधील महिलांना मोफत कार्ला दर्शन घडवले. यावेळी शेकडो महिलांनी केदार भगत यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आशिर्वाद मिळण्याचे साकडे एकविरा चरणी घातले. पनवेल शहरातील प्रभाग 19 मधील शेकडो महिलांना रविवार दिनांक 23 मार्च रोजी कार्ला येथील एकविरा देवीच्या दर्शनासाठी व एक दिवसीय सहलीसाठी नेण्यात आले. शहरातील गावदेवी मंदिरा समोरुन सहलीच्या बसेसला आमदार प्रशांत ठाकूर व जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून सोडण्यात आले. या सहलीत महिलांसाठी हळदीकूंकू, संगीत खुर्ची व उखाणे असे विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करुन विजेत्यांना बक्षीस देण्यात आले. तसेच डीजे च्या



तालवर नृत्य करण्याचा आनंद देखील महिलांनी घेतला. महिला दिनाचे औचित्य साधून स्त्रीत्वाला सलाम आणि मातृत्वाला वंदन करुन ही सहल आयोजित करण्यात आली होती.


यावेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, विशाल सावंत, प्रशांत शेटये, सचिन भगत, अभिजीत साखरे आदि उपस्थित होते. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी केदार भगत व त्यांच्या मित्र परिवाराने विशेष मेहनत घेतली.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

द•ख•ल

# पनवेल परिसरातून तरुणी बेपत्ता



**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** : भांडणाचा राग मनात धरुन एक तरुणी राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. जुली राजेश कोल (21 रा.पुष्पकनगर) असे या तरुणीचे नाव असून बांधा मजबूत, उंची 5 फुट 3 इंच, रंग सावळा, डोक्याचे केस काळे व साधारण डोळे काळे असून अंगात काळ्या रंगाचा टी-शर्ट व निळ्या रंगाची पॅन्ट तसेच पायात चप्पल नाही. तिला हिंदी भाषा अवगत आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पो.हवा.संदेश पाटील मो.नं.9892074503 येथे संपर्क साधावा.



**दैनिक युवक आधार** - सालाबाद प्रमाणे याही वर्षी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त दावत-ए-इफ्तार पार्टी देण्यात आली व सामजिक समतेचा संदेश देण्यात आला. या प्रसंगी उपस्थित डॉ.नरेंद्र जावळे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले)' नगराध्यक्ष राजुभैय्या जाधव, संदीप जावळे सर, सुनिल औसरमल, निलेश जावळे, प्रदीप जावळे, दादाराव जावळे, सुभाष गुंड, बाबा तिपटे, प्रकाश जावळे, नगरसेवक सुरज (भैय्या) जावळे, प्रतीक जावळे, अमोल जावळे, सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्ष सय्यद साजेद व मोठ्या संख्येने इतर मुस्लिम बांधव व भिमसैनिक उपस्थित होते.

**(छाया-शेख महेशर ताहेर पाटोदा.)**

## आधार कार्ड शिबिराचे आयोजन




**दैनिक युवक आधार**
**मुंबई (पंकजकुमार पाटील):** भाजपच्या वतीने आधार कार्ड शिबिराचे आयोजन कांजुरमार्ग ( पुर्व) मुंबई याठिकाणी करण्यात येणार आहे. दिनांक १ एप्रिल पासून सुरू होणाऱ्या शिबिरासाठी पुर्व नोंदणी आवश्यक असून सदर शिबिर डी/१०, उमंग ट्रस्ट लॅबोरेटरी, शहा कॉलनी, जसमीन स्टोर जवळ, कांजूरमार्ग (पूर्व ) येथे सुरू होणार असून या शिबिरात नवीन आधारकार्ड, फोटो बदलणे, आधारकार्ड दुरुस्ती ,पत्ता बदलणे इत्यादींसह यावेळी सिनिअर सिटीझन कार्ड देखील काढून देण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी सौ. अश्विनी कराडे (जिल्हा सचिव भाजप) यांच्याशी संपर्क साधावा. मो.9870347547

## आटोळा येथील जिल्हा परिषद

### शाळेत. क्षयरोग दिनानिमित्त कार्यक्रम



**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**
**शिरूरआनंतपाळ** : चाकूर तालुक्यातील आटोळा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत क्षयरोग मुक्त भारत अभियान अंतर्गत जागतिक क्षयरोग दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.यावेळी क्षयरोगाची लक्षणे, क्षयरोगासंदर्भाने घ्यावयाची काळजी व क्षयरोगावरील उपचार याची सखोल माहिती देण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक प्रमोद वाघमारे हे होते . यावेळी उपस्थित आरोग्य सेवक आबासाहेब पवार, आरोग्य सेविका अंजली शेवाळे,गटप्रवर्तक बालिका समगे,आशा कार्यकर्ती वनिता बावगे, कविता कदम, रेखा होनराव या सर्व आरोग्य कर्मचारी बांधवांनी क्षयरोगाची माहिती विद्यार्थ्यांना दिली.यावेळी वसंतराव ढगे,सुभाष केंद्रे, प्रमोद हुडगे, गणपती केंद्रे, प्रमोद बिराजदार, बळीराम बोळेगावे,आनंद चव्हाण, ज्योती बिराजदार आदिंनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद हुडगे तर आभार वसंतराव ढगे यांनी मानले.

# दिव्यांग सामाजिक संस्था उरणच्या सदस्यांनी माजी आमदार बच्चुभाऊ कडूंच्या आंदोलनाला दिला पाठिंबा.









**दैनिक युवक आधार**
**उरण प्रतिनिधी रणिता ठाकूर.**
दिनांक २३ मार्च २०२५ रोजी दिव्यांग सामाजिक संस्था उरण च्या सदस्यांनी रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी माजी आमदार बच्चुभाऊ कडू साहेब यांनी दिव्यांगांच्या आणि शेतकऱ्यांच्या योजना मंजूर करण्याकरता २१ मार्च ते २३ मार्च या तीन दिवस अन्नत्याग उपोषण करण्यात आले होते. याप्रसंगी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून दिव्यांग संघटना आपल्या हक्काच्या मागण्यांसाठी उपोषण स्थळी उपस्थित राहिले होते. त्यामध्ये उरण तालुक्यातील दिव्यांग बांधवांनी प्रत्यक्ष भेटून सदर आंदोलनात सहभाग तर नोंदविलाच त्याबरोबरच त्यांनी निवेदन ही दिले त्या निवेदनामध्ये "आपण दिनांक २१ ते २३ मार्च २०२५ दरम्यान रायगडाच्या पायथ्याशी मु. पाचाड, ता. महाड, जि. रायगड येथे अन्नत्याग आंदोलन आपल्या प्रहार दिव्यांग क्रांती संस्था व प्रहार जनशक्ती पार्टी यांच्यावतीने दिव्यांगाच्या न्यायासाठी, हक्कासाठी आणि स्वालंबनासाठी ठेवलेले आहे. या आंदोलनास राज्यभर दिव्यांगाची सेवा करणाऱ्या आमच्या दिव्यांग बांधवांकरीता आपण कार्य करत आहात. याकरिता आपली दिव्यांग सामाजिक संस्था उरण, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आपल्या आंदोलनास जाहीर पाठिंबा देत आहोत.असे आम्ही जाहीर करीत आहोत." असे आंदोलन करते बच्चुभाऊ कडू साहेब यांना निवेदन देण्यात आले. सदर अन्नत्याग उपोषणाची सांगता २३ मार्च २०२५ रोजी दुपारी करण्यात आली. सदर अन्नत्याग उपोषणाची सांगता करण्याच्या वेळी राज्यमंत्री योगेश कदम (ग्राम विकास व पंचायत राज)आमदार भरत शेठ गोगावले. (रोजगार हमी खाते) यांच्या उपस्थितीत आंदोलनाची सांगता करण्यात आली. आंदोलनासंदर्भात आदरणीय मुख्यमंत्री साहेब यांनी आश्वासन दिले आहे की.२ एप्रिल २०२५ या दिवशी सदर मागण्यांकरिता आपण बैठक बोलवणार आहोत आणि त्या बैठकीत योग्य तो निर्णय देण्यात येईल. याच वेळी २३ मार्च हा शहीद दिन असल्याकारणाने शहीद भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांच्या जीवनावर व्याख्यान ही ठेवण्यात आले. या आंदोलनाची सांगता झाल्यानंतर सर्व दिव्यांगांना जेवणाची ही व्यवस्था करण्यात आली होती. एकंदरीत दिव्यांगांसाठी झटणारा नेता बच्चुभाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आलेल्या अन्नत्याग उपोषणाची सांगता कोणतेही गालबोट न लागता व्यवस्थित रित्या संपन्न झाले.

## उष्माघातापासून वाचवणारं हिरव्यागार कैरीचे आरोग्यदायी आंबटगोड पन्हं...



**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**
रणरणता उन्हाळा सुरू झाला की, नक्कीच कैरीच्या पन्ह्याची आठवण येते. हा एक लोकप्रिय पदार्थ आहे. फळांचा राजा मिरवणाऱ्या आंबा फळाची चर्चा सुरु होते. आंबा कच्चा असो (कैरी) वा पिकलेला तो चवीने खातात. कच्चा आणि पिकलेल्या आंब्यापासुन आपण बरेच चविष्ट आणि आरोग्यदायी बनवतो. कच्च्या आंब्यापासून (कैरी) लोणचं, चटणी, पन्हे असो वा पिकलेल्या आंब्यापासुन बनवलेलं गोड असा आमरस, मँगो मिल्क शेक, असे एकापेक्षा एक पदार्थ चविष्ट कैरीच्या साहाय्याने पन्हे तयार केले जाते. याचे सेवन केल्याने तुमची पचनसंस्था निरोगी राहते. हे प्यायल्याने तुम्हाला लगेच ताजेतवाने आणि ऊर्जेने भरलेले वाटते. यासोबतच तुम्हाला डिहायड्रेशनचा त्रास देखील होत नाही.कडक उन्हात कोल्ड ड्रिंक घ्यायला मजा येते. यामुळे शरीराला झटपट ताजेतवाने आणि ऊर्जावान वाटते. साधारणपणे उन्हाळ्यात लोक लिंबूपाणी, जलजिरा, स्मूदी किंवा शेकचे भरपूर सेवन करतात. पण तुम्ही कधी कैरीचे पन्हे बनवून प्यायले आहात का? कैरीच्या साहाय्याने आंब्याचे पन्हे तयार केले जाते. याचे सेवन केल्याने तुमची पचनसंस्था निरोगी राहते. हे प्यायल्याने तुम्हाला लगेच ताजेतवाने आणि ऊर्जेने भरलेले वाटते. यासोबतच तुम्हाला डिहायड्रेशनचा त्रास देखील होत नाही.इतर कोणत्याही सरबतापेक्षा किंवा महागड्या कोल्ड्रिंकपेक्षा उन्हाळ्यात सर्वाधिक भाव खाऊन जातं ते कैरीचं पन्हं... कैरी, आंबा यांचं आकर्षण जेवढं असतं, तेवढंच आकर्षण त्यांच्यापासून बनविलेल्या पदार्थांचं असतं. म्हणूनच तर उन्हाळा सुरू होताच घरोघरी कैरीचं पन्हं, कैरीचं आंबटगोड लोणचं, तक्कू असं विविध पदार्थ बनवणं सुरू होऊन जातं.. त्यामुळेच तर लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच आवडणारं कैरीचं पन्हं कैरीमध्ये व्हिटॅमिन सी आणि अण्टीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. कैरीमध्ये फायबर मोठ्या प्रमाणात असल्याने उन्हाळ्यात निर्माण होणाऱ्या पचनाच्या समस्या कमी करण्यासाठी पन्हे उपयोगाचे ठरते. उन्हाळ्यात शरीर हायड्रेटेड ठेवण्यासाठी दररोज एखादा ग्लास पन्हे आवर्जून प्यावे. त्यामुळे शरीराला थंडावा मिळतो. कैरीमध्ये व्हिटॅमिन ए असते. जे डोळ्यांसाठी पोषक ठरते. कैरीमध्ये फायबर अधिक प्रमाणात असल्यामुळे पन्हे उर्जादायी ठरते. त्यामुळे पन्हे प्यायल्यानंतर बराच वेळ काही खाल्ले नाही तरी चालते.

# पालकांनो जागृत व्हा, थोडे तरी लक्ष द्या.

**दैनिक युवक आधार-** आजचे युग धावपळीचे युग आहे तंत्रज्ञानाचे युग आहे सर्व आपण आपल्या कामात व्यस्त आहोत आपल्याला आपल्या कुटुंबासाठी सुद्धा वेळ नाही इतके आपण या धावपळीचे युगामध्ये व्यस्त आहोत, आपल्या कुटुंबामध्ये काय चालू आहे आपला पाल्य किंवा मुलगा/ मुलगी काय करत आहेत ते दिवसभर कुठे व्यस्त असतात व काय करत असतात हे आपल्याला माहित नाही ही आपल्यासाठी खेदाची बाब आहे. बालकाच्या संगोपनासाठी पालक हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे, बालकाला पालक जसे संस्कार देतात तसे बालक घडत असतो परंतु आज पालकांच्या वेळेअभावी आपल्या बालकावर किंवा पाल्यावर दुर्लक्ष होताना दिसत आहे किंवा जाणून बुजून कानाडोळा करण्यात येत आहे, दिवसेंदिवस आज आपण एक बेजबाबदार पालक होत आहोत. आज आपल्या परिसरामध्ये खूप परिस्थिती बदललेली आहे सोशल मीडिया हे एक मुख्य कारण असू शकते किंवा मोबाईल फोन असू शकते. आपली पाल्याच्या बाबतीतली कर्तव्य तो पार विसरून गेला आहे, आणि ह्याचा दुष्परिणाम एकंदरीत पाल्याच्या जडणघडणीत दिसून येत आहे. कौटुंबिक जिव्हाळा, प्रेम, आपुलकी याच्या अभावाने मुले भावनाहीन, कठोर, निष्ठूर होत चालली आहेत. मुलांच्या दिनचर्येकडे पालकांचे दुर्लक्ष, फाजिल लाड यामुळे मुले बेछूट झाली आहेत. शिक्षकांशी पालकांना सोयरसुतक नाही. आपला पाल्य आपल्या माघारी कसे वागतो, त्याची संगत कशी व तो वेळ कुठे व कसा घालवतो याविषयी पालकांनी जागरूक असायला हवे. लहान वयातील मुले बेकायदेशीरपणे मोठी वाहने चालवताना दिसतात. त्यांना परिणामाची जात नसेल परंतु एक पालक म्हणून आपण नुसते बघत बसणार, त्याचे कौतुक बघणार? कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही म्हणून तर ही बेदरकार वृत्ती वाढीस लागते. अनेक लहान मुले व्यसनाधीन बनली आहेत. गुन्हेगारी प्रवृत्ती, टोळके तयार करणे, चोरी वगैरे करण्यास धजावतात. चंगळवादी जीवन कोवळ्या वयातील मुलांना घातक ठरू शकते. पालकांशिवाय इतर कुणी त्यांचे भले करेल, अशी आशा मूळीच बाळगू नये. समजंसपणा येईपर्यंत पालकांचे मुलांकडे अजिबात दुर्लक्ष असू नये. अनेक पालक, वेळ नाही हो।" अशी तक्रार करतात, परंतु जेव्हा तुमचा पाल्य तुमच्यावर वाईट वेळ आणेल तेव्हा मात्र वेळ गेलेली असेल. पाल्याचा आहार कसा आहे, आरोग्य कसे आहे, त्याची दिनचर्या काय आहे आणि एकंदरीत त्यांचे चरित्र कसे आहे, पालकांना ह्याची पूर्ण जाणीव हवी. पेरले ते उगते हे विसरू नये. वेळेवर लक्ष दिले नाही, तर फार मोठे संकटउभे राहू शकते. आपला पाल्य कोणत्या मानसिकतेत वावरतो हे लक्षात घेतले पाहिजे. लक्षात ठेवा, अचानक काही उद्‌भवत नसते, त्याचे बीज कधीतरी आपणच तयार केलेले असते. पालकांना सबबी सांगून जवाबदारी झटकता येणार नाही. शिक्षकांनी सुसंवाद साधला पाहिजे, पाल्याच्या जडणघडणीत शिक्षकांचा फार मोठा वाटा असतो. शिक्षकांविषयी आदर बाळगून आपल्या पाल्याच्या बाबतीत विचारपूस केली पाहिजे. पाल्यास भौतिक सुविधा पुरविणे, इतकेच पालकांचे कर्तव्य नाही, तर त्याचे भावनिक विश्व समजून घेणे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. पाल्याचा मित्र बनून त्याचा मानस समजून घेता आला पाहिजे. आपल्या पाल्यावर ज्या पालकांचे नियंत्रण नाही, त्या पालकांना पश्चात्ताप करण्याची वेळ येते. पाल्याचा जीवनात अतिहस्तक्षेप नको, तसे पूर्ण दुर्लक्षही नको. समतोल साधला पाहिजे. बालगुन्हेगारीचे वाढते प्रमाण लक्षात घेता, पालकांनी वेळीच सावध असले पाहिजे. डोळे बंद करून विश्वास ठेऊ नये, कधीतरी शंका घेतली पाहिजे,आजच्या धकाधकीच्या व धावपळीच्या जीवनात पाल्याकडे होणारे दुर्लक्ष फार मोठी किंमत चुकवावी लागते हे लक्षात असू द्या म्हणून म्हणतो पालकांनो जागृत व्हा व थोडं तरी लक्ष द्या लक्ष द्या.. धन्यवाद...



लेखक
पठाण जावेद युसुफखान
संस्कार बालक मंदिर

# सेलूत शहिद दिनानिमित्त गुणगौरव सोहळा आई-वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करा -प्रा.आर एस.यादव




**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी:- महेश राऊत**
सेलू येथे दि.23मार्च रविवार रोजी शहरातील हुतात्मा स्मारक येथील योगा हॉलमध्ये शहीद दिनानिमित्त 'निर्मिक गुणगौरव सोहळा' संपन्न झाला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी जि.प.सदस्य मुंजाभाऊ भिसे,प्रमुख मार्गदर्शक प्रा. आर .एस.यादव , प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार सतीश आकात, सामाजिक कार्यकर्ते सुनील गायकवाड,श्रीराम रेंगे , कवयित्री अश्विनी घोगरे, पि.के. शिंदे यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि शहिद दिनानिमित्त शहिद भगतसिंग यांच्या प्रतिमा पुजनाने झाली.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात निर्मिक कोचिंग क्लासेसचे संचालक शुकाचार्य शिंदे यांनी दरवर्षी विद्यार्थ्यांना अभ्यासात प्रेरणा मिळावी म्हणून हा गुणगौरव सोहळा घेत असल्याचे सांगितले. पत्रकार सतिश आकात यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांचे कष्ट लक्षात घेत महापुरुषांच्या विचार आणि कार्यानुसार आचारण ठेवून अभ्यास करण्यास सांगितले.सामाजिक कार्यकर्ते सुनील गायकवाड यांनी आई वडीलांचा आदर करुन ज्ञान देणाऱ्या गुरुजनांचाही सन्मान करावा असे आपल्या मनोगतामध्ये सांगितले. प्रमुख मार्गदर्शक प्रा आर .एस यादव यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना शहिद भगतसिंग यांच्या वाचनाबद्दलच्या आवडीचे उदाहरण दिले. भगतसिंगाने देशासाठी लढत असताना फासावर जात असताना शेवटची इच्छा विचारली असताना भगतसिंगांनी मी तुरुंगात एक पुस्तक वाचत आहे,ते पुस्तक वाचून झाले की तुम्ही खुशाल फाशी द्या.या उदाहणाचा दाखला देत विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सांगितले . ते पुढे मार्गदर्शनात म्हणाले की विद्यार्थ्यांनी ध्येय उच्च ठेवून जिवनात यश संपादन करावं यासाठी विद्यार्थ्यांना गरुडाचे उदाहरण देत आयुष्यात यश मिळवून उंच भरारी घेण्यासाठी सांगितले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला .सेलू मध्ये प्रथमच शासनाच्या `बेटी बचाओ, बेटी पढाओ ' या धोरणाला अनुसरून निर्मिक कोचिंग क्लासेस मधून वर्ग 10 वी बोर्ड परीक्षा मार्च 2024 मध्ये मुलींमधून 91.40% गुण मिळवून प्रथम येणाऱ्या कु. सोनाली पवार या विद्यार्थ्यांनीस 'क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले पुरस्कार 'देऊन गौरविण्यात आले. त्याचबरोबर क्लासेस मधून विविध स्पर्धा परीक्षा आणि क्लास मधील परीक्षेत यश प्राप्त करणाऱ्या इतर 30 विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश बरसाले, तर आभार प्रदर्शन सुरेश कुलकर्णी यांनी केले.कार्यमाच्या यशस्वीतेसाठी अंजली भुजबळ ,यशा कदम प्रमोद कदम ,ॲड. विजय लाटे यांनी परिश्रम घेतले.

# यवतमाळ वनविभागाला हादरा! ठिय्या आंदोलनानंतर चौकशी व कारवाईचे आश्वासन!

## गर्भवती माकडीणीच्या मृत्यूनंतर पेटले यवतमाळ – वनविभागाच्या बेजबाबदार कारभाराविरोधात ठिय्या आंदोलन!





**दैनिक युवक आधार**
**(प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)**
**यवतमाळ,दि.24 मार्च.**
यवतमाळ जिल्ह्यात वन्यजीव संरक्षणाच्या बाबतीत वनविभागाच्या निष्काळजी आणि असंवेदनशील वर्तनामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.या ढिसाळ व्यवस्थेचा पर्दाफाश करणारी घटना म्हणजे गर्भवती माकडीणीचा मृत्यू.

**माकडीणीचा मृत्यू आणि वनविभागाची उदासीनता!**
अलीकडेच एका गर्भवती माकडीणीला गंभीर दुखापत झाली होती.प्रा.पंढरी पाठे व एम.एच.29 हेल्पिंग हॅन्ड वन्यजीव संघटनेच्या सदस्यांनी वेळेत वनविभागाला कळवले,मात्र रेंज फॉरेस्ट ऑफिसच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विलंब दाखवला,आणि वेळेत वैद्यकीय मदत मिळाली नाही.त्यामुळे दोन्ही जीव गमवावे लागले! ही घटना वनविभागाच्या ढिसाळ आणि बेजबाबदार कार्यशैलीचे जिवंत उदाहरण ठरली. या घटनेनंतर जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी दिलेल्या निवेदनांकडे दुर्लक्ष करण्यात आले.परिणामी, यवतमाळ जिल्ह्यातील निसर्गप्रेमी, पर्यावरण कार्यकर्ते आणि सामाजिक संघटनांनी एकत्र येत आज 24 मार्च (सोमवार)रोजी सकाळी 11 ते दुपारी 3 वाजेपर्यंत यवतमाळ वनभवन येथे ठिय्या आंदोलन छेडले.

**ठिय्या आंदोलनानंतर प्रशासन जागेवर!**
मुख्य वनसंरक्षक निलेश सोनवणे यांनी आंदोलनाचे मुख्य प्रा. पंढरी पाठे व आंदोलकांशी चर्चा करत संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन दिले. चौकशीत रेंज फॉरेस्ट ऑफिसर अमर सिडाम आणि त्यांच्या संबंधित कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित होईल आणि दोषी आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल,असे त्यांनी स्पष्ट केले.

> गर्भवती माकडीणीचा मृत्यू हा वनविभागाच्या अपयशाचे प्रतीक आहे.प्रशासनाने जागे होऊन तातडीने सुधारणा करावी,अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल!
> **प्रा.पंढरी पाठे(कृषी तथा वन्यजीव अभ्यासक)**

**आंदोलनाच्या प्रमुख मागण्या:**
यवतमाळमध्ये वन्यजीव उपचार केंद्र तातडीने सुरू करावे.
रॅपिड रेस्क्यू टीममध्ये अनुभवी वन्यजीव रक्षक आणि सर्पमित्रांचा समावेश करावा.
सर्पमित्रांना अधिकृत ओळखपत्रे (ID Card) तातडीने द्यावीत.
वनक्षेत्राच्या घटण्याच्या कारणांची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.
टिपेश्वर अभयारण्यात भोंगळ कारभार थांबवून,वनसंवर्धनासाठी ठोस पावले उचलावीत.

उद्याचा निर्णायक टप्पा – प्रशासनासमोर मागण्यांची लढाई!
25 मार्च रोजी डिस्ट्रिक्ट फॉरेस्ट ऑफिसर (DFO) यांच्यासोबत विशेष बैठक होणार आहे.या बैठकीत मागण्यांवर निर्णय घेतला जाणार असून,वनविभागाच्या कारभारावर गंभीर चर्चा होणार आहे. त्यानंतर यवतमाळ जिल्ह्यातील सर्व वन्यजीव प्रेमींची बैठक रेड्डी सरांच्या मार्गदर्शनाखाली होईल, जिथे पुढील दिशा ठरवली जाणार आहे.

**संघर्षाचे नेतृत्व आणि उपस्थित कार्यकर्ते:**
हे आंदोलन कृषी तथा वन्यजीव अभ्यासक प्रा.पंढरी पाठे आणि कॉम्रेड सचिन मनवर,निलेश मेश्राम,प्रज्वल तुरकाने यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.
यावेळी उपस्थितांमध्ये शुभम तेलगोटे,महेश शेळके,गट्टू भगत,दिनेश पिंपरे,आदित्य गणवीर, प्रथमेश जाधव,सचिन कोकणे,नंदन चव्हाण,विद्या परचाके,वैष्णवी मडावी, त्रिवेणी मेश्राम,त्रिशुला चपारिया,मोहन मुरखे,अजित गजभिये,सत्यम डोंगरे, विनोद दोंदल,प्रतीक तरळकर,अंकित पवार,पृथ्वीराज चव्हाण,वनसंवर्धनासाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

# विवेकानंद बालसंस्कार केंद्रात वासंतिक शिबीर संपन्न



**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी:- महेश राऊत**
सेलू येथील विवेकानंद नगरातील विवेकानंद बालवाडी केंद्रात प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीच्या संस्कार शिबीराचा प्रारंभ मानवता धर्माची शिकवण देणाऱ्या " खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे " या साने गुरूजींच्या शिबीर गीताने झाला. सर्वश्री गौतम सूर्यवंशी, सुधीर चौधरी, किरण डुघ्रेकर ,मकरंद दिग्रसकर व श्रीमती लीलाताई देशपांडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमापूजन झाले.दि.१९ ते २२ मार्च २०२५ या चार दिवसाच्या कालावधीत चाललेल्या या शिबीरात सकाळी ८ते १० या वेळेत प्रारंभी योग,प्राणायाम, विविध प्रेरणादायी स्तोत्रे, साने गुरूजींच्या संस्कार कथा व सामाजिक, राष्ट्रीय व सांस्कृतिक विचारांचे विज्ञानाधिष्ठीत उद्‌बोधन कार्यक्रम झाले. सानेगुरूजींच्या स्वावलंबन,साहस श्रमप्रतिष्ठा आदि कला गुणांचे धडे देणाऱ्या कथांच्या आधारे वृक्षारोपण, संवर्धन व जपणूक आदींचे प्रात्यक्षिक करून घेण्यात आले.यात सौ.मोहिनी लोणीकर सौ.रेणुका बोथे, सौ.आष्टीकर , सौ.देशमुख यांनी बालकांना मार्गदर्शन केले.साने गुरूजी कथामालेच्या हेलस ता.मंठा जि.जालना येथील केंद्रप्रमुख श्रीमती.कल्पनाताई हेलसकर व ज्येष्ठ कवी श्री.गौतम सूर्यवंशी यांची प्रमुख पाहुणे म्हणून तर अध्यक्षस्थानी श्री. सुधीर चौधरी होते.व्यासपीठावर सर्वश्री.किरण डुघ्रेकर व मकरंद दिग्रसकर आणि श्रीमती लीलाताई देशपांडे यांचीही उपस्थिती होती. श्रीमती.कल्पनाताई हेलसकर यांनी उपस्थित बालकांना मनोरंजक बडबड गीतात सहभागी करत साने गुरूजींच्या कथेतून संस्कारात पालकांची भूमिका व महत्त्व विशद केले.आजच्या काळात आपल्या मुलांच्या मोबाईल वापरावर नियंत्रण ठेवण्याची गरज असल्याचे सांगितले.श्री.गौतम सूर्यवंशी यांनी "आई आमची शाळा " या कवितेतून बालक व पालकांचे संस्कारक्षम नाते विशद केले. या प्रसंगी उपस्थित पालकांपैकी सौ.प्राप्ती रोडगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.श्री.किरण डुघ्रेकर यांचे यावेळी शिक्षण व संस्काराचे महत्त्व विशद करणारे समयोचित भाषण झाले.अध्यक्षीय समारोप श्री.सुधीरराव चौधरी यांनी केला.कार्यक्रमाचे संचालन सौ.मोहिनी लोणीकर यांनी केले तर सौ.देशमुख यानी उपस्थितांचे आभार मानले.सामुहिक पसायदानाने शिबीराची सांगता झाली.शिबीर यशस्वी करण्यासाठी बालवाडी ताई यांचेसह सेविका संजीवनीताई व जनसेवा पतसंस्थेच्या कर्मचार्यांनी परिश्रम घेतले.

# पत्रकार संजय कदम यांना रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या वतीने देण्यात आला "शांतता आणि संघर्ष निवारण पुरस्कार"

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पनवेल तालुका प्रेस क्लबचे सदस्य व रायगड जिल्हा प्रेस क्लबचे सल्लागार संजय कदम यांच्या ३० वर्षाच्या पत्रकारीता आणि सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेत रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या वतीने "व्यवसाय सेवा पुरस्कार" आणि "शांतता आणि संघर्ष निवारण पुरस्कार" ने त्यांना सन्मानित करण्यात आले. पनवेल शहरातील सिंधी पंचायत सभागृह येथे हा सोहळा संपन्न झाला. रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल तर्फे दरवर्षी व्यवसाय करतानाच समाजासाठी काम करणाऱ्या एखाद्या सेवाभावी व्यक्तीला व्यावसायिक सेवा पुरस्कार प्रदान करण्यात येत असते. पनवेल तालुका प्रेस क्लबचे सदस्य व रायगड जिल्हा प्रेस क्लबचे सल्लागार संजय कदम यांच्या ३० वर्षाच्या पत्रकारीता आणि सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेत रोटरी 3131 चे जिल्हा गव्हर्नर शीतल शाह यांच्या हस्ते "व्यवसाय सेवा पुरस्कार" आणि "शांतता आणि संघर्ष निवारण पुरस्कार" ने त्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी रोटरी जिल्हा प्रथम महिला रागिणी शाह, सहाय्यक गव्हर्नर डॉ. किरण कल्याणकर, पीडीजी डॉ. गिरीश गुणे, अध्यक्ष शैलेश पोटे, सचिव दीपक गडगे, रोटेरियन आणि अनस, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल सदस्य उपस्थित होते.


संजय कदम यांचा शांतता आणि संघर्ष निवारण पुरस्कार ने सन्मान

# वाहनांना हाय सिक्युरीटी नंबर प्लेट एचएसआरपी बसविणे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

वाहनांना हाय सिक्युरीटी नंबर प्लेट एचएसआरपी बसविणे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक असुन वाहनांमुळे होणारे गुन्हे कमी करण्यासाठी वाहनांची ओळख पटवणे नंबरप्लेट मध्ये छेडछाड व बनावटगिरी करुन होणारे गुन्हे कमी करणे यासाठी सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले असुन या निर्देशांची अंमलबजावणी व नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन 1 एप्रिल 2019 पुर्वी उत्पादीत झालेल्या सर्व जुन्या नोंदणीकृत वाहनांना हाय सिक्युरीटी नंबर प्लेट एचएसआरपी बसविणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तरी ज्या वाहनधारकांची वाहने 1 एप्रिल 2019 रोजी उत्पादीत झालेली आहेत अशा सर्व वाहनधारकांनी परिवहन विभागाच्या HTTPS::TRANSPORT.MAHARASHTRA.GOV.IN या संकेतस्थळावर जाऊन त्याबाबत नोंदणी करावी. या कामासाठी परिवहन विभागाने अधिकृत कंपन्याची नेमणुक केली असुन त्यांच्यामार्फतच हाय सिक्युरीटी नंबर प्लेट लावणे बंधनकारक आहे. इतर अनधिकृत नोंद केंद्र सरकारच्या डेटाबेसमध्ये नोंद होणार नाही. विक्रेत्यांकडुन नंबरप्लेटची पोर्टलवर असल्यास परिवहन विभागाच्या तक्रारी अथवा याविषयी काही काही शंका अथवाDYTCCOMP.TPT-MH@GOV.IN या इमेल वर संपर्क साधावा असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत सर्व वाहनधारकांना करण्यात येत आहे. तसेच वाहनधारकांची गैरसोय व कार्यालयातील होणारी गर्दी टाळण्यासाठी वाहनधारकांना आवाहन करण्यात येते की ज्या वाहनधारकांचा मोबाइल नंबर वाहन प्रणालीवर नोंद नसेल अशा वाहनधारकांनी त्यांचे स्वतःचे इ मेल वरुन या कार्यालयाच्या इ मेल RTO 46-MH@MAH.GOV.IN वर मेल करुन आपले इआधारकार्ड व वाहन नोंदणी पुस्तक जोडुन मोबाइल न ंबर अपडेट करण्यासाठी अर्ज करावा असे आवाहन प्रादेशिक परिवहन पनवेल कार्यालया मार्फत सर्व वाहन धारकांना आवाहन करण्यात येत आहे. तसेच परिवहन विभागामार्फत सदर हाय सिक्युरीटी नंबरप्लेट बसविण्याची देण्यात आलेली अंतीम मुदत 30 जून 2025 पर्यंत वाढविण्यात आली आहे याची सर्व वाहनधारकांनी नोंद घ्यावी व सर्व वाहनधारकांनी जुन्या वाहनांना एचएसआरपी नंबरप्लेट बसवुन घ्यावी असे प्रादेशिक परिवहन पनवेल कार्यालया मार्फत सर्व वाहन धारकांना आवाहन करण्यात येत आहे.

# खंडणी आणि मारहाण प्रकरणी माजी सरपंचासह पाच जणांविरोधात गुन्हा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: कंपनी चालू ठेवण्यासाठी प्रत्येक महिन्याला 50 हजार रुपयांची खंडणी मागून मारहाण केल्याप्रकरणी माजी सरपंच डीबी म्हात्रे यांच्यासह पाच जणांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी पाचही आरोपींना अटक केली आहे. पनवेल तालुक्यातील वावंजे येथील एका कंपनीत 21 मार्च रोजी दुपारी बाराच्या सुमारास अमर बाळाराम सांगडे, माजी सरपंच डीबी (धनराज) म्हात्रे, रोशन तुकाराम पाटील, प्रकाश रामा पाटील, नाना शंकर पाटील गेले. आणि त्यांनी या कंपनीच्या मॅनेजर यांच्याकडे कंपनी चालू ठेवण्यासाठी प्रत्येक महिन्याला 50 हजार रुपयांची खंडणी मागितली. आणि त्यांच्यासोबत असलेला अमर सांगडे याला कामावर ठेवले नाही तर बघून घेण्याची धमकी दिली. यावेळी मॅनेजरने त्यांना विरोध केला असता त्यांना हाताबुक्क्याने मारहाण करण्यात आली आणि शिवीगाळ केली. यात ते जखमी झाले. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात देण्यात आल्यानंतर तालुका पोलिसांनी खंडणी आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला आणि आरोपींना अटक केली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# निफाड शिक्षक परिषदेचे पंचायत समिती समोर धरणे आंदोलन

## मागणी मान्य न झाल्यास आमरण उपोषण करणार

**युवक आधार निफाड**
**प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

आज पंचायत समिती निफाड समोर महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद राज्य सरचिटणीस कार्यवाह संजय बबनराव पगार यांच्या नेतृत्वात सातवा वेतन आयोग सेवा पुस्तक पडताळणी संबंधी अक्षम्य दिरंगाई बाबत संबंधित कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करणे बाबत मागणी पूर्ण न झाल्याने धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले. ऑगस्ट 2018 रोजी सातव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चिती झाल्यानंतर तब्बल सात वर्षे होऊन गेली परंतु अद्यापही संबंधित सेवा पुस्तकांची पडताळणी शिक्षण विभागाने केलेली नाही. या कारणास्तव संबंधित दिरंगाई करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई होईपर्यंत प्रथम तीन दिवस धरणे आंदोलन तदनंतर साखळी उपोषण, घंटानाद आंदोलन ,आमरण उपोषण करण्याचा इशारा शिक्षक परिषदेने दिला आहे. आंदोलनादरम्यान निफाड गटविकास अधिकारी तुकाराम जाधव, सहाय्यक गटविकास अधिकारी सुनील पाटील, शिक्षण विभागाचे प्रतिनिधी वसंत गायकवाड आदींनी आंदोलन स्थळी भेट देऊन समस्या व शिक्षक परिषदेची भूमिका जाणून घेतली आंदोलनामध्ये राज्य उपाध्यक्ष दीपक खैरनार,विभागीय अध्यक्ष वासुदेव बोरसे, जिल्हाध्यक्ष रमेश गोहिल, जिल्हा सरचिटणीस रावसाहेब जाधव, विभागीय कोषाध्यक्ष राजेंद्र खैरनार, जिल्हा कोषाध्यक्ष सुनील अहिरे, जिल्हा कार्यकारी अध्यक्ष जितेंद्र खोर, जिल्हा संघटक प्रशांत शेवाळे, जिल्हा महिला आघाडी प्रिती कामडी,माधवी वैद्य,निफाड तालुका नेते प्रवीण कोळी, राहुल सोनवणे,निफाड तालुकाध्यक्ष संदीप गायकवाड, दिंडोरी तालुकाध्यक्ष सुभाष बर्डे, इगतपुरी तालुकाध्यक्ष वैभव उपासनी ,येवला तालुकाध्यक्ष प्रशांत शिंदे, बागलाण तालुकाध्यक्ष संजय पाटील, त्र्यंबकेश्वर तालुकाध्यक्ष संतोष शार्दुल, पेठ तालुकाध्यक्ष राजाराम वाघ, चांदवड तालुकाध्यक्ष महेंद्र जाधव, कार्यवाह/सरचिटणीस विलास पानपाटील, श्रावण भोये, कार्तिक जाधव, चिंतामण मोहन, अशोक पवार,



नितीन शिंदे,विश्वास आहेर, कैलास बांगर, राजेंद्र कापसे, परशराम ठाकरे, अरविंद माळी, अनिल धनवटे, वैशाली जाधव,उदयकुमार कुर्हाडे, राजेंद्र गाडे, दत्तात्रय कमोदकर, एकनाथ पाटील ,साहेबराव पगारे , दादाजी अहिरे,पिंटू गांगुर्डे, रवींद्र भरसट, अनिल खैरनार, विलास पानपाटील, दिनकर डगळे, सुधाकर नाठे, देवकुमार जाधव, योगेश पवार, अशोक जाधव, पंकज भारुडे, रणजीत शिंदे, नानासाहेब साळकर, संतोष सूर्यवंशी, लेकराज चौधरी, रमेश आडे,मानसिंग महाले, उमेश कुमार शिंदे, अशोक जाधव, राहुल बच्छाव ,विकास मुळे ,प्रशांत कोळी, परशुराम ठाकरे, अनिल गावित ,दीपक मोरे , महेंद्र वाघ, योगेश कडाळे,राजेंद्र साळुंखे,अरविंद राठोड ,शैलेश गुंजाळ ,बापू शिंगाडे, कैलास गवळे, रवींद्र आभाळे, ज्ञानेश्वर जाधव ,भाऊसाहेब बडे, महेंद्र वाघ, प्रभाकर राठोड, दयानंद कवडे, मच्छिंद्र जगताप, जयमाला जगताप, माधवी वैद्य, सुनिता शहारे, पल्लवी शेंदूरशे, सुनंदा खैरनार, मालती जावळे, सुरेखा शेटे, वंदना पवार, जयश्री पगार,सुरेखा खैरनार, हौसाबाई बोरसे, मनीषा निकम, निर्मला ठाकरे, मनीषा रुपनवर, सुरेखा जाधव, महेश कोर, दिनेश्वरी बोरकर, सुरेश भोये, रमाकांत शिंदे, बापूसाहेब गोसावी, संभाजी काकडे, महेंद्र वाघ, प्रशांत कोठावदे, वसंत सुपारे, गिरीश पवार, साहेबराव सोनवणे ,संभाजी काकडे आदी उपस्थित होते.

# केम्सपॅक केमिकल्सच्या कंत्राटी

## कामगारांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्याची जागृती फाऊंडेशनची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**


तळोजा एमआयडीसी येथील केम्सपॅक केमिकल प्रायव्हेट लिमिटेड कंपनीतील कंत्राटी कामगारांनी कंपनीच्या गेट समोर उपोषणाचे हत्यार उपसले आहे. थकीत वेतन मिळावे आणि नोकरीमध्ये सामावून घेण्याची मागणी स्थानिक कंत्राटी कामगारांनी केली आहे. या बाबत 104 कंत्राटी कामगारांनी जागृती फाऊंडेशन चे अध्यक्ष निलेश सोनावणे यांची भेट घेतली, कामगारांचे म्हणणे ऐकुन घेत स्थानिक कामगारांवर अन्याय होऊ नये बेरोजगार होऊ नये यामुळे केम्सपॅक केमिकल्सच्या कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्याची मागणी जागृती फाऊंडेशन चे अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी प्रशासनाला केली आहे. कामगारांना नोकरीत सामावून घेत नाहीत तोपर्यंत लढा दिला जाईल असे सोनावणे यांनी यावेळी सांगितले केम्सपॅक या कंपनीत १०४ कामगार कंत्राटी पद्धतीने काम करीत होते. कंपनीला आग लागल्यानंतर काही महिने कंपनी व्यवस्थापनाने बंद केली होती, पुन्हा नव्याने कंपनी सुरु करण्यात आली मात्र त्यांतील काही कामगारांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेण्यात आले. तर काहींना त्यांचे वेतन थेट खात्यात जमा करून कोणतीही पूर्वसूचना न देता घरी बसवण्यात आले त्यानंतर कंपनीने कंत्राटदाराला बदलून कंपनीने नवीन कंत्राटदाराची नेमणूक केली. त्यामुळे येथील स्थानिक पडघे, कोलवाडी वावंजे आदी गावातील स्थानिक कामगार कामापासून वंचित ठेवले. सध्या कामगारांची आवश्यकता असुन देखील कंपनीत नाक्यावरील परप्रांतीय कामगार आणून काम केले जाते मात्रं स्थानिक कामगारांना कामावर घेण्यास कंपनी व्यवस्थापनाने कानाडोळा केल्याचे चित्र
असल्याचे या कामगारांनी सांगितले. यासंदर्भात डिसेंबर २०२४ मध्ये कामगार उपायुक्त, पनवेल यांच्याकडे झालेल्या सुनावणीत कंपनी टप्प्याटप्प्याने कामगारांना नोकरीमध्ये सामावून घेईल, असे सांगितले होते, मात्र त्यांनी तसे केले नाही. त्यामुळे या कामगारांनी आमरण उपोषण केले ते देखील प्रशासनाच्या मदतीने चिरडण्याचा प्रयत्न कंपनी करीत आहे, स्थानिक पोलीस यंत्रणेवर दबाव टाकत कंपनी स्थानिक कामगारांवर अन्याय करीत आहे थकीत वेतन मिळावे, तसेच पुन्हा नोकरीवर सामावून घ्यावे या मागण्यांसाठी सुरु केलेले हे आंदोलन न्याय मिळेपर्यंत कामगारांन सोबत सनदशीर मार्गाने लढा देउ असे फाऊंडेशन चे अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी सांगितले .

# आता रोबोट करणार गुडघे आणि नितंबावर शस्त्रक्रिया

## मेडिकव्हर रुग्णालयात रोबोटिक तंत्रज्ञानाच्या आविष्कारातून शस्त्रक्रिया घडणार

**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले**
**संपादक**

सध्याच्या काळात गुडघा आणि नितंब दुखण्याच्या समस्या केवळ वृद्धांपुरत्याच मर्यादित राहिलेल्या नसून अनेकांना दैनंदिन आयुष्यात गुडघेदुखी आणि नितंबदुखीच्या असह्य वेदना जाणवत असल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. गुडघे आणि नितंबदुखीचा वाढता त्रास लक्षात घेत नवी मुंबईतील मेडिकव्हर रुग्णालयाने आता रोबोटच्या मदतीने गुडघे आणि नितंब दुखणीवर वेदनाविरहित उपाय शोधला आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने आता नवी मुंबईतील मेडिकव्हर रुग्णालयात रोबोट गुडघे आणि नितंब बदलांची शस्त्रक्रिया केली जाईल. रोबोटच्या साहाय्याने वेदनाविरहित शस्त्रक्रिया करणे शक्य झाल्याने रुग्णांना फारसा त्रास जाणवार नाही. अचूक शस्त्रक्रियेचे आव्हान आता रोबोटच्या मदतीने शक्य झाल्याने रुग्ण लवकर बरा होतो, काही दिवसांतच चालायलाही लागतो, अशी माहिती डॉक्टरांनी दिली. चुकीची जीवनशैली, स्थूलत्व, संधिवात आणि दुखापतींमुळे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच गुडघेदुखीचा आणि नितंबदुखीचा त्रास जाणवू लागला आहे. या त्रासाने सर्व वयोगटातील लोकांना दैनंदिन आयुष्यातही अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. रोजचे आयुष्य जगताना येणा-या मर्यादा लक्षात घेत रुग्णांनी आता डॉक्टरांकडे धाव घेतली आहे. या वाढत्या रुग्णांबाबत डॉक्टरांनी चिंता व्यक्त केली. ही समस्या ध्यानात घेत नवी मुंबईतील मेडिकव्हर रुग्णालयातील डॉक्टरांनी आता मिस्सो तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला आहे. ही तंत्रज्ञान प्रणाली रोबोटच्या मदतीने रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करते. रोबोटच्या मदतीने नुकतीच एका ७६ वर्षीय वृद्ध महिलेवर रुग्णालयातील डॉक्टरांनी गुडघे आणि नितंब बदलाची यशस्वी शस्त्रक्रिया केली. ही महिला गुडघे दुखीने हैराण झाली होती. तिला गुडघ्यांचा संधिवात होता. आज, शुक्रवारी या वृद्ध महिलेवर डॉक्टरांनी मिस्सो तंत्रज्ञानाचा आविष्कार असलेल्या रोबोटच्या मदतीने गुडघे बदलाची यशस्वी शस्त्रक्रिया केली. विशेष म्हणजे शस्त्रक्रियेनंतर अवघ्या दोन तासांतच ती चालण्यास सक्षम झाली. ही रोबोटीक शस्त्रक्रिया रुग्णांसाठी फायदेशीर ठरली असून, शस्त्रक्रियेनंतर रुग्ण पटकन बरे करण्यासही मदत करत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या शस्त्रक्रियेमुळे आव्हानात्मक शस्त्रक्रियाही विनाअडथळा पार पाडणे शक्य झाल्याचे समाधान डॉक्टरांनी व्यक्त केले. शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडल्यानंतर नवी मुंबईतील मेडिकव्हर रुग्णालयाकडून पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले. यावेळी *मेडिकव्हर रुग्णालयाचे ऑर्थोपॅडिक संचालक डॉ. दीपक गौतम यांनी वाढत्या गुडघे आणि नितंबदुखीच्या रुग्णांबद्दल चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, "* आजकाल तरुणांमध्ये गुडघा आणि नितंब दुखणीच्या समस्यांचे प्रमाण वाढत आहे. या दुखणीतून बरे होण्यासाठी पारंपरिक शस्त्रक्रिया प्रभावी असल्या तरीही त्यातून रुग्णांना बरे होण्यास बराच वेळ लागतो. अंदाजे ७० टक्के लोकांना कधी ना कधी आयुष्यात गुडघा किंवा नितंब दुखण्याचा त्रास जाणवतो. त्यापैकी १०-२० टक्के रुग्णांना गुडघे किंवा नितंब बदलाची शस्त्रक्रिया करावी लागते. मिस्सो तंत्रज्ञानावर आधारित रोबोटिक शस्त्रक्रिया ही वैद्यकीय क्षेत्रात तंत्रज्ञानाचा आविष्कार मानला जात आहे. डॉक्टरांना रोबोटच्या मदतीने गुडघे आणि नितंब बदल शस्त्रक्रियेत अचूकता साधणे शक्य झाले आहे. बरेचदा शस्त्रक्रियेदरम्यान रुग्णांच्या शरीरातील रक्त वाया जाते. आता ही भीतीही दूर सरली गेली आहे. ही शस्त्रक्रिया संक्रमणाचा धोका कमी करते. परिणामी, रुग्णाचा रुग्णालयीन मुक्काम कमी राहतो. रुग्ण थोड्या दिवसांतच पूर्णपणे बरा होतो. "



मिस्सो ऑर्थो रोबोट थ्रीडी इमेजिंग खास कारणांसाठी डिझाईन करण्यात आले आहे. या रोबोटच्या मदतीने शस्त्रक्रियेत अचूकता साधता येते. रुग्णाच्या शरीरातील मऊ ऊतींचे जतन करता येते. इम्प्लांट योग्य रित्या बसवता येतो. परिणामी, शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या शरीरात तातडीने सुधारणा दिसून येतात. मेडिकव्हर रुग्णालयाने रुग्णांसाठी या आधुनिक रोबोटिक प्रणालीचा अवलंब केला आहे. या प्रणालीच्या वापराने रुग्णांना शस्त्रक्रियेदरम्यान कोणत्याही गुंतागुंतीचा सामना करावा लागणार नाही. उपचार जलदगतीने होत असल्याने आता रुग्ण लवकर बरे होण्याचा काळ आता पूर्वीपेक्षाही कमी झआला आहे. शस्त्रक्रियेनंतर रुग्ण स्वतःहून चालतात. त्यांना कोणाचीही मदत लागत नाही. मेडिकव्हर रुग्णालय उत्कृष्ट रुग्णसेवेची खात्री देण्यासाठी वचनबद्ध आहे.
**डॉ .माताप्रसाद गुप्ता -**
**मेडिकव्हर रुग्णालयाचे केंद्र प्रमुख**

मेडिकव्हर रुग्णालयात ७६ वर्षीय महिला रुग्णावर रोबोटच्या मदतीने गुडघा बदल शस्त्रक्रिया पार पडली. ही महिला गुडघ्याच्या संधीवाताने हैराण झाली होती. शस्त्रक्रिया यशस्वी पार पडल्यानंतर ७६ वर्षीय वृद्ध महिला कोणाचीही मदत न घेता स्वतःहून चालू लागली.

आम्ही रुग्णसेवा पुरवताना नावीन्यतेवर भर देतो. नवनवीन तंत्रज्ञानाचा आविष्कार अंमलात यावा, याकडे आमचा कटाक्ष आहे. जेणेकरुन रुग्णांनाही सुरक्षितता लाभेल, आरामदायी उपचार घेता येतील.
नीरज लाल -
**मेडिकव्हर रुग्णालयमहाराष्ट्र विभागाचे प्रादेशिक संचालक**

# महाराष्ट्र राज्य सॉफ्ट टेनिस संघात इरा आयथनं(कर्णधार), प्रकाश गौतम आणि प्रणित दोडे यांची निवड; लुधियाना, पंजाब येथे होणार राष्ट्रीय स्पर्धा



**दैनिक युवक आधार**
**रायगड वार्ताहर**

सॉफ्ट टेनिस फेडरेशन ऑफ इंडिया व पंजाब सॉफ्ट टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 18 वी सब - जुनिअर गट राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस अजिंक्यपद स्पर्धा दिनांक 27 मार्च ते 31 मार्च 2025 दरम्यान लुधियाना, पंजाब येथे संपन्न होणार आहे . सदर स्पर्धेत महाराष्ट्र संघ सहभागी होणार असून महाराष्ट्र संघात रायगड जिल्हाचे खेळाडू महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. सदर राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत रायगड सॉफ्ट टेनिस असोसिएशन खेळाडू इरा आयथनं- विश्वज्योत हायस्कूल खारघर, प्रकाश गौतम - महात्मा इंटरनॅशनल स्कूल खांदा कॉलनी आणि प्रणित दोडे- सेंट मेरीज मल्टीपर्पज हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज वाशी यांची माटुंगा, मुंबई येथे झालेल्या सब - जुनिअर निवड चाचणी मधून महाराष्ट्र संघात निवड झालेली असून रायगड जिल्हाचे सचिव स्वप्निल वारंगे यांची महाराष्ट्र संघांचे प्रशिक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. महाराष्ट्र संघात निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र ऑलिम्पिक असो. चे सचिव नामदेव शिरगावकर महाराष्ट्र सॉफ्ट टेनिस असोसिएशनचे सचिव रवींद्र सोनवणे सर जिल्हा क्रिडा अधिकारी रायगड सॉफ्ट टेनिस स्पोर्ट्स असो चे सचिव स्वप्निल वारंगे सर माणगाव जिल्ह्याचे क्रिडा मार्गदर्शक संजय गमरे सर आदीनी अभिंनदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# ईश्वराचा न्याय निवाडा अंतिम

रमजान महिन्याची वाटचाल आता शेवटाकडे सुरू झाली आहे.ईदची तयारी जोरात सुरु झाली आहे. शेवटच्या टप्प्यात झकात,सदका,फित्रा यांचे वितरण करण्यामध्ये सर्व जण व्यस्त आहेत. गरजूंना शोधून मदत केली जात आहे.अल्लाह आणि त्याचे पैगंबर हजरत मोहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी सांगितलेल्या मार्गानुसार प्रत्येक जण आचरण करण्याचा प्रयत्न करीत आहे.ईदचा आनंद सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वजण प्रयत्नशील आहेत. मानवता काय असते याची प्रचिती रमजान महिन्यामध्ये अनेकांना आली आहे.मदत करण्यासाठी प्रत्येक जण पुढे येत आहे. गरजूंना मदत करून त्यांच्या गरजा भागवताना आपल्या पदरात पुण्य कसे प्राप्त होईल याचा प्रत्येक जण विचार करत आहे. आपल्याला प्राप्त बळाचा किंवा अधिकाराचा दुरुपयोग करू नये अशी महत्त्वाची शिकवण कुरआन शरीफ मध्ये दिली गेली आहे.जागा बळकावणे,संपत्ती हडप करणे,अधिकार ग्रहण करणे या बाबींना इस्लाममध्ये कोणताही थारा नाही.वीतभर जागा जरी आपण कोणाची बळकावली तर कयामतच्या दिवशी त्याचा मोठा जाब आपल्याला द्यावा लागेल हे प्रत्येकाने ध्यानात घेतले पाहिजे.जगा आणि जगू द्या या सूत्राचा अवलंब करूनच प्रत्येकाने आपले जीवन व्यतीत केले पाहिजे. थोडेसे अधिकार मिळाल्यानंतर त्याचा सदुपयोग करण्याऐवजी दुरुपयोग करण्याकडे जास्त कल असतो.परंतु ते अधिकार अल्पकालिक असतात ही जाणीव ठेवून जर आपण वागलो तर पायउतार झाल्यानंतर देखील लोक आपल्याशी प्रेमाने वागतात असा सर्वसाधारण लोकांचा अनुभव आहे. आपल्याला जे काही करावयाचे आहे ते चांगलेच करावे,कुणाला तरी खाली दाखवण्यासाठी अधिकारांचा दुरुपयोग करणे योग्य नाही. जीवन कसे जगावे याचे चिंतन करण्यासाठी कुरआन




शरीफ वाचला पाहिजे.तो समजून घेतला पाहिजे आणि त्यामध्ये अभिप्रेत आहे त्याप्रमाणे आपले आचरण केले पाहिजे. तरच आपण यशस्वी होणार आहोत. जगातील अनेक चालीरिती इस्लामला मान्य नाहीत.इस्लाम धर्मामध्ये मद्यपान करणे निषिद्ध मानले गेले आहे.इस्लामपूर्व काळामध्ये सर्वजण मद्यपान करीत होते.मात्र त्याचे होणारे दुष्परिणाम पाहून साक्षात अल्लाहने मद्यपानाला प्रतिबंध लावला.त्यामुळे एका वाईट गोष्टीला मनाई करण्यात आली.आपण पाहतो या दारुच्या व्यसनापायी अनेक कुटुंब उध्वस्त झाली आहेत तर अनेक लोक देशोधडीला लागले आहेत. अनेकांची प्रतिष्ठा धुळीस मिळून समाजामध्ये आपली इज्जत राहत नाही.एका वाईट सवयी मुळे संपूर्ण जीवन बेचिराख होते. म्हणूनच त्यावर धार्मिकदृष्ट्या बंदी घालण्यात आली आहे. अशा इतर अनेक गोष्टी आहेत कि ज्या इस्लामने अमान्य करून त्यावर बंदी लावली आहे.परंतु ते समजून न घेता त्यावर भाष्य केले जाते हे दुर्दैवी आहे.चांगल्या गोष्टींचा स्वीकार आणि वाईट गोष्टींचा तिरस्कार हे सूत्र जर आपण अवलंबले तर नक्कीच आपले जीवन सफल झाल्याशिवाय राहणार नाही. या दुनियेत चांगली माणसं गप्प असल्यामुळे वाईट कृत्य करणाऱ्यांचे फावते.परंतु मनगटशाहीच्या बळावर कोणी अन्याय करू पाहत असेल तर त्याला न्याय द्यायचे काम ईश्वर करीत असतो हे विसरता कामा नये.त्याचा न्याय अंतिम असतो. एखादा प्रसंग घडल्यास आपण न्याय निवाडा न करता तू ईश्वरावर सोपवला तर निश्चितपणे आपल्या मनाला समाधान होईल असं तोडगा तेथून मिळतो.(क्रमशः)

**सलीमखान पठाण**
**9226408082.**

# टीबी मुक्त जिल्हा करण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील रहा - अशोक शिनगारे, जिल्हाधिकारी.

## टीबी मुक्त ग्रामपंचायतींना 28 कास्य, 136 रोप्य मानांकनाने सन्मानित.

**दैनिक युवक आधार**
**अमित जाधव - ठाणे**

**ठाणे ता २४ मार्च** : इ. स. १८८२ साली डॉ. रॉबर्ट कॉक यांनी क्षयरोगाच्या जिवाणूंचा शोध लावला. त्यांचा प्रबंध जागतिक शास्त्रज्ञाच्या परिषदेत मांडला व त्यास दि. २४ मार्च रोजी मान्यता मिळवली म्हणून २४ मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग दुरीकरणाकरिता विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येतात. त्याअनुषंगाने जिल्हा क्षयरोग केंद्र, ठाणे कार्यालय अंतर्गत दि. २४ मार्च, २०२५ रोजी जिल्हाधिकारी ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली टीबी मुक्त ग्रामपंचायत अभियाना अंतर्गत टीबी मुक्त ग्रामपंचायती म्हणुन निवड करण्यात आलेल्या केंद्र शासनाच्या निर्देशांकानुसार व सहसंचालक आरोग्य सेवा, क्षय व कुष्ठ पुणे यांचे मार्गदर्शक तत्वानुसार एकूण २८ रोप्य प्रशस्तीपत्र देऊन ग्रामपंचायतींना महात्मा गांधी यांचा पुतळा जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या शुभ हस्ते देऊन गौरविण्यात आले आहे. तसेच १२ निक्षय मित्र व ४ टीबी चॅम्पीयन यांना देखील प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे. याप्रसंगी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी ठाणे जिल्हातील एकूण ग्रामपंचायतीमधील 28 कास्य व 136 रोप्य मानांकन देऊन पुढील वर्षी उर्वरित सर्व ग्रामपंचायती ह्या लवकरच सिल्वर मधून सुवर्ण नामांकन प्राप्त करण्यास प्रयत्न करून ठाणे जिल्ह्यात क्षयरोग हद्दपार करूयात, असे आवाहन केले. कार्यक्रम हा जिल्हा क्षयरोग केंद्र कार्यालय व जी. एल. आर. ए. इंडिया (जर्मन लेप्रसी एन्ड टी बी रिलीफ असोसिएशन ऑफ इंडिया) या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. त्यामध्ये एन. के. टी. माध्यमिक ज्युनिअर महाविद्यालयातील 250 मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच नर्सिंग टी एन. के. टी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची टीबी विषयक चित्रकला, रांगोळीच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. तसेच टीबी जनजागृती करिता पथनाट्य नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या समोर सादर केला.



## निवडक

### शहीद दिनानिमित्त क्रांतिवीरांना अभिवादन

**मुरूड-जंजिरा :** मुरूड शहरातील जुनी पेठ येथील समाजसेवक मोहन गजानन करंदेकर यांच्या निवासस्थानी क्रांतिवीर भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या ९४ व्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेकडो मान्यवरांनी क्रांतिवीरांना पुष्प वाहून आदरांजली वाहिली. भारताला पारतंत्र्यांतून मुक्त करण्यासाठी भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांनी बलिदान दिले. २३ मार्च १९३१ रोजी रोजी लाहोरच्या सेंट्रल जेलमध्ये भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना फाशी देण्यात आली. २३ मार्च हा शहीद दिवस म्हणून पाळला जातो.

### उरणमध्ये सागरी सुरक्षा बाइक रॅलीचे आयोजन

**उरण :** पोलीस सहा आयुक्त, नवी मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हास्तरीय सागरी सुरक्षा समन्वय समितीच्या बैठकीत सागरी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पोलीस ठाणे स्तरावर २ मोटारसायकल रॅली/मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्याअनुषंगाने उरण-न्हावाशेवा-मोरा सागरी पोलीस ठाणे हद्दीतील सागर रक्षक दल सदस्य, मच्छिमार बांधव आणि पोलीस अंमलदार यांच्या संयुक्त सहभागाने उरण पोलीस ठाणे हद्दीत मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कोस्टल फ्री हेल्पलाइन क्रमांक १०९३ चे टी-शर्ट परिधान करून आणि माहितीपत्रके वाटून जनतेमध्ये सुरक्षा जागरूकता निर्माण करण्यात आली. या मोटारसायकल रॅलीत एकूण ४५ सागर रक्षक दल सदस्य आणि मच्छिमार बांधव सहभागी झाले होते.

### नेपाळ युवा महोत्सवात मिहीर देसाई यांची उपस्थिती

**डोंबिवली :** २७ ते ३१ मार्च या कालावधीत, काभ्रेपलाञ्चोक (नेपाळ) येथे जागतिक युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये ७५ हून अधिक देशातून प्रतिभाशाली युवा, संशोधक विद्यार्थी, कलाकार व यूथ लिडर्स सहभागी होणार आहेत. ॲग्रिकल्चर ॲंड फुड सिक्युरिटी या विषयावर संबोधित करण्यासाठी डोंबिवलीतील मिहीर देसाई यांना विशेष अतिथीचा मान देण्यात आला आहे.

# सिडकोचा नैना प्रकल्प न्यायालयीन कचाट्यात

**उच्च न्यायालयात तसेच राष्ट्रीय हरित लवादाकडे याचिका**

**नवी मुंबई :** सिडकोचा नैना प्रकल्प वादात सापडण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. सुरुवातीपासून या प्रकल्पाला विरोध करणाऱ्या प्रकल्पग्रस्तांनी १० याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करून नैना परियोजनेच्या वैधतेलाच आव्हान दिले आहे. या याचिका नैना परियोजना २ व ७ वर करण्यात आल्या असून एक याचिका राष्ट्रीय हरित लवाद, दिल्ली यांच्याकडे करण्याची तयारी पर्यावरण तज्ज्ञ सुरेश रानडे यांनी केली आहे. प्रकल्पग्रस्तांनी नैनाविरोधात न्यायालयात धाव घेतल्याने सिडकोचा नैना प्रकल्प अडचणीत येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.



### ९५ गावांची एक कृती समिती स्थापन

प्रत्येकवेळी सिडकोने नैना प्रकल्पग्रस्तांना थातुरमातूर कारण देत चर्चेचे गुऱ्हाळ चालवत वेळ मारून नेली. गेल्या ८ वर्षांत सिडकोने १२ परियोजना नैना प्रकल्पांतर्गत मंजूर केल्या आहेत. सिडकोविरुद्ध याचिका करण्यासाठी ९५ गावांनी एक कृती समिती स्थापन करून तिच्यामार्फत जनजागृती करण्यात आली आणि न्यायालयीन लढाई लढण्याचा इरादा प्रकल्पग्रस्तांनी निश्‍चित केला आहे.

### सिडकोने संवैधानिक प्रक्रिया पार न पाडल्याचा आरोप

सिडकोने कोणतीही संवैधानिक प्रक्रिया पार न पाडता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चा वापर करून सदर परियोजना राबवण्याचा प्रयत्न केल्याचे समितीचे अध्यक्ष सुरेश ठाकूर यांचे म्हणणे आहे. अजूनही हजारो कोटी रुपये प्रकल्पग्रस्तांचा वाढीव मोबदला देणे बाकी असताना व कोणतीही जमीन ताब्यात नसताना ७९३२ कोटींची विकासकामे काढणे हे सिडकोसारख्या शासकीय यंत्रणेला दिवाळखोरीत लोटण्याचा डाव आहे.

२०१३ पासून ९५ गावांच्या प्रकल्पग्रस्तांनी सिडकोच्या नैना प्रकल्पाला जोरदार विरोध केला आहे. सुरुवातीला १०० टक्के जमीन संपादित करून ६० टक्के जमीन परत करण्याची योजना सिडकोने आणली होती. त्यानंतर त्यांनी त्यात बदल करत ६० टक्के जमीन परत करण्याऐवजी ४० टक्के जमीन परत करण्याची योजना आणली. त्यामुळे स्थानिक प्रकल्पग्रस्त गत १२ वर्षांपासून उपोषण, मोर्चाच्या माध्यमातून सदर योजनेस विरोध करत आहेत. जर शासनाने योग्य निर्णय घेतला नाही, तर हे आंदोलन आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, नैनातील ८ प्रकल्पग्रस्तांनी मुंबई उच्च न्यायालयात याबाबत याचिका दाखल केल्या आहेत. तर २ याचिका दाखल करण्याच्या प्रक्रियेत आहेत. या याचिकांमध्ये शेतकऱ्यांचा बुडणारा रोजगार, शेतकऱ्यांची संमती नसताना ७९३२ कोटींची काढलेली विकासकामे, सातबारा उतारे रद्द करण्याची सुरू केलेली प्रक्रिया याला स्थगिती देण्यासह अनेक मुद्दे याचिकेत घेण्यात आले आहेत. तर दुसरीकडे सिडकोकडे नैना प्रकल्प राबवण्यासाठी पर्यावरण विभागाचे समंतीपत्र नसल्याने सदर प्रकल्प रद्द करण्याबाबत पर्यावरण तज्ज्ञ सुरेश रानडे यांनी राष्ट्रीय हरित लवादाकडे याचिका दाखल करण्याची तयारी सुरू केली आहे. ९५ गावात असलेली गुरचरण जमीन सिडकोने जिल्हाधिकारी रायगड यांच्यामार्फत खरेदी-विक्रीचा व्यवहार सुरू केल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

# यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेसह १७ जणांचा प्रितम म्हात्रे यांच्याहस्ते उलवेरत्न गौरव, त्रिवार्षिक उलवेरत्न पुरस्कार सोहळ्याला उलवेकरांची गर्दी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

आम्ही उलवेकर मित्र मंडळ उलवे यांच्यावतीने दिला जाणारा त्रिवार्षिक उलवेरत्न पुरस्कार शनिवारी शेकापचे खजिनदार तथा पनवेल मनपाचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम जे. एम. म्हात्रे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, गव्हाण ग्रामपंचायत सरपंच माईताई भोईर यांच्या प्रमुख उपस्थितीत उलवेतील सेक्टर १७ येथील मैदानावर पार पडला. यावेळी समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या यमुना सामाजिक शैक्षणिक संस्था शेलघर यांच्या १७ रत्नांचा गौरव करण्यात आला असून आम्ही उलवेकर मित्र मंडळाच्यावतीने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सचिन राजे - येरुणकर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला. तीन वर्षातून एकदा आयोजन करण्यात येत असलेल्या या उलवेरत्न पुरस्कार सोहळ्याचे हे दुसरे पर्व मोठ्या दिमाखदार पद्धतीने पार पडले.

आम्ही उलवेकर मित्र मंडळाच्या वतीने समजपयोगी कार्यक्रमांसह सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन देखील यावेळी करण्यात आले होते. यावेळी भक्तीगीते, गवळण, श्रीमंत छत्रपती शिवरायांच्या सहसाचे दर्शन घडविणारा पोवाडा आणि लावणीचे बहारदार गायन तसेच नृत्य सादर करून उलवेकरांना महाराष्ट्राच्या संस्कृतीची मेजवानी देण्यात आली. आम्ही उलवेकर मित्र मंडळ हे गेली अनेक वर्षे सातत्याने उलवे परिसरात सामाजिक उपक्रम राबवित असताना सर्वसामान्य जनतेला भेडसावणाऱ्या प्रशांना देखील वाचा फोडत असते. या पुरस्कार सोहळ्यामध्ये एकूण १७ रत्नांचा शोध घेऊन त्यांना गौरविण्यात आले. यामध्ये कवी आणि घोषवाक्य डिझायनर कुणाल उत्तम वारुळे, लेखिका मनीषा अश्विन पोखरकर, व्यसनमुक्ती केंद्राच्या संचालिका तथा समाजसेविका मनीषा वसंत वाळकुंडे, कराटे या खेळात प्राविण्य मिळावीणारा ओमकार चिदंबरम अय्यर, परिसरातील महत्वपूर्ण बाबी जगभरात नेणारा युट्युबर स्वप्निल गाडगे, उद्योजिका अंकिता वानेश गोंधळी, गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर आणि इंडियन वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर साईशा राऊत, गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर आणि इंडियन वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर सिद्धार्थ दास, अभिनेता महेंद्र तांडेल, गायक यज्ञिक साईनाथ मोकळ, समाजसेविका निकिता निलेश खारकर, समाजसेवक वितेश म्हात्रे, बेसबॉलपट्टू तनवी गणेश इंगळे, अथलेटिकमध्ये सुवर्ण कामगिरी करणारा रचित संदीप पाटील, क्रिकेट या खेळाचे उत्तम सादरीकरण करून रायगड जिल्ह्यात अव्वल राहणारा संघ जीवदानी स्पोर्ट्स क्लब बामण डोंगरी, सामाजिक संघटना संत वामन भाऊ आणि संत भगवान बाबा सेवा ट्रस्ट आणि अनेक सेवाभावी संस्थांना, गोरगरिबांना सर्वतोपरी मदत करण्यासाठी नेहमीच अग्रेसर असणारी संस्था म्हणजेच यमुना सामाजिक शैक्षणिक संस्था शेलघर यांचा उलवेरत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वीय सहाय्यक पल्लवी सरोदे यांचे निधन



**ठाणे :** ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील सहाय्यक महसूल अधिकारी तथा जिल्हाधिकाऱ्यांची स्वीय सहाय्यक या पदावर कार्यरत असणाऱ्या पल्लवी सरोदे (३७) यांचे रविवारी सकाळी हरिहरेश्वर समुद्रकिनाऱ्यावर अपघाती निधन झाले. कार्यालयीन मैत्रिणींसह त्या हरिहरेश्वर या ठिकाणी सहलीनिमित्त गेल्या होत्या. तेथील समुद्रकिनारी त्या लाटेत अचानक ओढल्या गेल्या, त्यात त्यांचा मृत्यू झाला. पल्लवी सरोदे या ठाणे जिल्हा २०१२ रोजी लिपिक या पदावर रूजू झाल्या होत्या. मार्च २०२४ मध्ये त्यांना सहाय्यक महसूल अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आली होती. त्या सध्या जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या स्वीय सहाय्यक म्हणून कार्यरत होत्या.

पल्लवी सरोदे यांच्या निधनानंतर जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव, जिल्ह्यातील इतर महानगरपालिकांचे आयुक्त, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, पोलीस अधीक्षक डॉ. डी. स्वामी यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील आणि ठाणे जिल्हा प्रशासनातील अन्य विविध शासकीय विभागांच्या अधिकारी कर्मचाऱ्यांकडून आदरांजली वाहण्यात आली. सरोदे यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे पती, सासू-सासरे आणि मुलगा (१३) असा त्यांचा परिवार आहे.

# उल्हासनगरात गुन्हेगारी टोळ्यांवर पोलिसांचा हल्लाबोल

### दोघा सराईत गुंडांवर 'मकोका' अंतर्गत कारवाई



**उल्हासनगर :** उल्हासनगर शहरात पोलिसांनी गुन्हेगारीच्या मुसक्या आवळण्यासाठी निर्णायक पाऊल उचलले आहे. शहरात सोनसाखळी चोरीसह अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये सक्रिय असलेल्या दोघा कुख्यात गुंडांवर 'मकोका' अंतर्गत कारवाई करत पोलिसांनी गुन्हेगारी जगताला थेट इशारा दिला आहे. ही कारवाई केवळ कायद्याचा बडगा नसून, उल्हासनगरच्या रस्त्यांवर दहशत माजवणाऱ्या टोळक्यांना गंभीर इशाराच ठरली आहे.

आकाश उर्फ बाबू छोटेलाल पारचे आणि तिरबान उर्फ त्रिभुवन चौहान अशी 'मकोका' अंतर्गत कारवाई करण्यात आलेल्या सराईत गुंडाची नावे आहेत. या दोघांनी उल्हासनगर परिसरात सोनसाखळी चोरीसह (चेनस्नॅचिंग) अनेक नागरिकांना लक्ष्य करत धुमाकूळ घातला होता. त्यांच्याविरुद्ध विविध पोलीस ठाण्यांमध्ये अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. पोलीस तपासात या गुंडांचा मागील गुन्हेगारी इतिहास उघडकीस आला. त्यांच्याविरोधात अनेक वेळा कारवाई करण्यात आली असली तरी ते पुन्हा पुन्हा गुन्हेगारीच्या मार्गाकडे वळत होते. त्यामुळे कायद्याचा कठोर बडगा उगारत पोलीस उपायुक्त सचिन गोरे त्यांच्या विरोधात थेट मकोका अंतर्गत कारवाई करण्याचा निर्णय घेतला.

> शहरात संघटित गुन्हेगारी वाढू नये यासाठी आम्ही सातत्याने पावले उचलत आहोत. सराईत गुन्हेगारांविरोधात 'मकोका'सारख्या कठोर कायद्याची अंमलबजावणी ही त्याचाच एक भाग आहे. अशा कारवाया पुढेही सुरू राहतील आणि उल्हासनगरमध्ये गुन्हेगारीला थारा मिळणार नाही, यासाठी पोलीस दल कटिबद्ध आहे.
>
> **- सचिन गोरे** (पोलीस उपायुक्त, उल्हासनगर)

# लायन्स क्लब ऑफ पनवेल, द्रोणगिरी व उरण आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स,

### पनवेल व श्री अविनाश म्हात्रे (पाले) व मित्र परिवार,उरण पूर्व विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगार मेळावा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)**

रविवार दिनांक २३ मार्च २०२५ रोजी सकाळी १० ते ३.३० वा. रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिरकोन, ता. उरण (कृ. द. जोशी सभागृह) येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या रोजगार मेळाव्यामध्ये आतापर्यंत एकूण २५० उमेदवारांनी ऑनलाईन रजिस्ट्रेशन केले होते आणि तसेच या रोजगार मेळाव्यामध्ये ३०० ते ३५० मुले सहभागी झाले होते या रोजगार मेळाव्यात १८ ते २० अशा विविध नामांकित कंपन्या व नियोक्त्यांकडून रिक्त पदे भरण्यात आले होते या रिक्त पदांसाठी पात्रतेप्रमाणे उमेदवारांच्या नोंदणी व प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या तरी हा भव्य रोजगार मेळावा प्रसिद्ध करण्यासाठी लायन्स क्लब ऑफ पनवेल, द्रोणगिरी व उरण आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स, पनवेल व श्री अविनाश म्हात्रे (पाले) व मित्र परिवार, उरण पूर्व विभागातर्फे आम्ही आपल्याला हजर राहण्याचे आवाहन केले होते

**लायन एस. जी. चव्हाण**

अध्यक्ष लायन्स क्लब ऑफ पनवेल. ला. अशोक गिल्डा सचिव लायन्स क्लब पनवेल. ऐड ला.के.एस.पाटील प्रोजेक्ट कॉर्डिनेटर. ला. प्रमोद गजहंस प्रो. प्रोकॉर्डिनेटर. श्री समाधान फॅल्कटी लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी ला.संदीप म्हात्रे डीसि एल सी आय एफ.ला.सागर चौकार अध्यक्ष. ला. मोनिका चौकार सचिव. ऍड ला. दिपाली मडवी खजिनदार ला.भूमिका सिंग उपाध्यक्ष लायन्स क्लब ऑफ उरण ला. ज्ञानेश्वर कोकावदे अध्यक्ष तसेच आयोजित व सहकार्य अविनाश म्हात्रे (पाले) मुकुंद गावंड (पिरकोन) अमित पाटील (पाणदिवे) आनंद वर्तक (गोवठणे) नागेंद्र मात्रे, ला. अड. मदन गोवारी,ला. मधुकर भगत, ला. के. एस पाटील (सारडे) निवास गावंड (आवरे) पुरण पाटील (वशेणी) हरिचंद्र म्हात्रे (पाले ) गणेश गावंड सर(पिरकोन) कमलाकर म्हात्रे (पाले) विनोद डाकी (पुनाडे ) लायन्स क्लबचे सर्व सदस्य व रोजगार विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते



# पनवेल, द्रोणागिरी, उरण पूर्व विभागाचा रोजगार मेळावा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर**

लायन्स क्लब ऑफ पनवेल, द्रोणगिरी व उरण आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स, पनवेल व श्री अविनाश म्हात्रे(पाले) व मित्र परिवार, उरण पूर्व विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगार मेळावा पिरकोण येथे संपन्न झाला. हया कार्यक्रमाचे उद्‌घाटन विशेष अतिथी मल्टिपल कौन्सिल चेअरमन एम जे एफ लायन ए. के शर्मा तसेच लायन एस जी चव्हाण तसेच उपस्थित सर्व पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून त्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले व कंपन्यांचे एच आर यांना सन्मानचिन देऊन त्यांचेही स्वागत करण्यात आले. या रोजगार मेळाव्यामध्ये एकूण २७५ ऑनलाईन उमेदवारांनी रजिस्ट्रेशन केले होते. तेथे प्रत्यक्षात उपस्थित असलेल्या ८५ ते ९० मुलांच्या मुलाखती वेगवेगळ्या कंपनीतील एच आर कडून थेट घेण्यात आल्या. अशा २०ते २५ मुलांना मान्यवरांच्या हस्ते लेटर ऑफ इंटेन लेटर देण्यात आले. आणि त्यांना कंपनीत दुसऱ्या राउंडमध्ये बोलावण्यात येईल. लायन्स क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष एस जी चव्हाण यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले की आज येथे २३कंपन्यांनी या रोजगार मेळाव्यामध्ये भाग घेतलेला आहे. आणि ज्या २७५ उमेदवारांनी ऑनलाईन नाव नोंदणी केले आहे व जे तरुण आज इथे उपस्थीत आहेत त्या तरुणांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन लगेचच त्यांच्या पात्रतेनुसार कंपनीत बोलावले जाईल व त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल. ज्या मुलांकडे अनुभव नाही म्हणून ते कंपनीशी बार्गेनिंग करू शकत नाही. म्हणून या सरकारच्या अप्रेंटिस नप्स योजनेद्वारे ऑन द जॉब ट्रेनिंग दिली जाते आणि त्याच एन एसडीच सर्टिफिकेटही दिल जात. त्यांच्या या अनुभवानुसार व त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांना थर्ड पार्टीवरती किंवा कंपनीमध्ये कायमस्वरूपी नोकरी मिळते. लायन्स क्लबच्या ८ उद्दिष्टांपैकी युथ हे एक आमचं उद्दिष्ट आहे. आम्ही आतापर्यंत खारपाडा, मोहोपाडा, जे एम म्हात्रे ट्रस्ट, तुराडे असे बरेच रोजगार मेळावे भरवले आहेत. आणि त्यामार्फत आम्ही हजारो मुलांना नोकऱ्या दिल्या आहेत. त्यामध्ये उद्दिष्ट हेच आहे की युथ लोकांची एम्पॉवरमेंट करून त्यांचा विकास करायचा आहे. खेडॉपाड्यातील मुलांना आज जॉबची गरज आहे. पण त्यांनी रिलोकेट व्हायला पाहिजे. आम्ही स्वतः प्रत्येकाकडे नोकरी घेऊन जाऊ शकत नाही. पण अशा रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून तुमच्यासाठी नोकरीच्या संधी आम्ही उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्यासाठी आम्हाला संस्थेचे सहकार्य लागते. आणि आम्ही यांच्यामार्फत तरुणांपर्यंत पोहोचू शकतो. यामध्ये अविनाश म्हात्रे यांचं सुद्धा मोलाचं सहकार्य लाभले आहे आणि इतर सदस्यांचे ही त्यांनी आभार मानले. अविनाश म्हात्रे यांनी आपल्या भाषणात हा पहिलाच प्रयत्न असल्याचं त्यांनी सांगितलं. केवळ एक तेदीड महिन्यात हा कार्यक्रम राबविण्यात आला त्यात चव्हाण साहेबांचं मोठ योगदान आहे. जिथं पैसा आणि वशिला नसताना काम लागत नाही. तिथे आज या ठिकाणी पैसे न खर्च करता नोकरी मिळाली पाहिजे या हेतूने हा रोजगार मेळावा भरवण्यात आला आहे. आम्ही फक्त मार्ग दाखविणार आहोत आणि आज येथे प्रत्येक विद्यार्थ्याला नोकरी मिळालीच पाहिजे असही सांगण्यात आलं. या रोजगार मेळाव्यामध्ये विशेष अतिथी एम जे एफ लायन ए के शर्मा, डिस्ट्रिक्ट कॉर्डिओनेटर लायन विजय गणत्रा, अड. लायन मदन गोवारी, लायन जितेंद्र मलिक, लायन मिलिंद सूर्यवंशी, लायन एस जी चव्हाण, लायन अशोक गिल्डा, लायन के एस पाटील, लायन प्रमोद गझहंस आणि इतर लायन सभासद उपस्थित होते. द्रोणगिरी क्लबच्या लायन संदीप म्हात्रे, लायन सागर चौकार, लायन मोनिका चौकार, लायन दीपाली मढवी, लायन भूमिका सिंग,लायन ॲड.चेतन भोईर तसेच उरण क्लबचे लायन कोठावडे, लायन नीलिमा नारखेडे,लायन मनीष घरत, लायन साहेबराव ओहोळ इत्यादी लायन सभासद उपस्थित होते. तसेच श्री अविनाश म्हात्रे सर, श्री. मुकुंद गावंड, श्री. अमित पाटील, श्री. नागेंद्र म्हात्रे, श्री. निवास गावंड, श्री. पुरण पाटील, श्री. हरिश्चंद्र म्हात्रे, श्री. गणेश गावंड, श्री. कमलाकर म्हात्रे, श्री. विनोद डाकी इत्यादी इतर सदस्य उपस्थित होते.



# शहीद भगतसिंगांच्या विचारसरणीत भारलेले ॲड. गोपाळ शेळके !!

### रायगडभूषण प्रा एल बी पाटील.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

कर्जत येथील कोकण मराठी साहित्य परिषद कर्जतचे
कामेड ॲड.गोपाळ शेळके यांनी शहीद भगतसिंग यांच्या विचारांत भारलेले असल्याने ४४ वर्षे आधी पासून तालुक्यात कम्युनिस्ट विचारसरणीचे सामाजिक आणि राजकीय कार्य चालू ठेवले आहे. दरवर्षी २३ मार्च रोजी तालुक्यात
शहीद दिनाला साजेसे सामाजिक साहित्यिक उपक्रम करून शहीद भगतसिंगांची विचारसरणी रुजविली आहे असे विचार कार्यक्रम अध्यक्ष रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील यांनी मांडले.यावेळी साहित्य क्षेत्रात विशेष कार्य केलेले पत्रकार पुरुषोत्तम मुळेंचा,नशाबंदीचा गावपातळीवर प्रचार आणि कोमसापच्या साहित्यिक उपक्रम केल्याबाबत लवेंद्र मोकल यांचा आणि गझलकारा प्रांतात महाराष्ट्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्योत्स्ना राजपूत यांचा विशेष पुरस्कार प्रदान करून मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.यावेळी कोमसाप जि.प्र.गणेश कोळी, आपत्ती निवारण सुप्रसिद्ध मार्गदर्शक जयपाल पाटील,अड. संतोष जोहेकर,लेखक निळकंठ पाटील, अनंत भोईर,अड भारती ढाकवळ यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन जनार्दन सताणे यांनी केले.

कविसंमेलनात अनिल भोईर,
रमण पंडित,मारुती बागडे, अक्षता गोसावी, अरुण पाटील, जी.एच.ठाकूर,शरद पुगावकर, ज्ञानेश्वर वाडिले,भगवान म्हात्रे, अरुण म्हात्रे,विजया कुडवे, ॲड.सतिश शेळके इत्यादी ३५ कवींनी कवितांचे वाचन गायन केले.

प्रास्ताविक ॲड.गोपाळ शेळके आणि स्वागत ज्ञानेश्वर वाडिले यांनी केले.

